
[ वर्ष २६ वें

# " श्री साईलीला "

त्रैमासिक



वार्षिक वर्गणी रु. २-४-०

# श्री साईलीला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ।
प्रादूर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २६ ] त्रैमासिक—जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, १९४९ [ अंक ३ रा

## —: संपादकीय :—

प्रभू-विश्वंभरानें हें विश्व निर्माण केलें व त्यांत आपल्या मनोरंजनाकरतां दगड-धोंडे, माती, डोंगर, टेंकड्या, पाणी, नद्या, सरोवरें, डबकीं, वेली, झाडें—झुडपें, जलचर प्राणी, सरपटणारे प्राणी, गाय, बैल, घोडा, वाघ, सिंह, वगैरे वगैरे व वाचा आणि बुद्धीच्या माणसास निर्माण केलें.

एके दिवशीं दगड व भूमाता बोलत बसलीं होतीं. त्यावेळीं दगडानें आईस ( भूमातेस ) विचारलें कीं " आई, असें मी काय पाप " केलें आहे, कीं ज्यांनीं त्यानीं—माझ्या सर्व भाऊबहिणींनीं—मला तुच्छ लेखून, नाक; मुरडून ! तूं दगड आहेस, जा, तिथें बैस, इकडे येऊं नकोस " असा माझा क्षणोक्षणीं अपमान करावा. आई तुझीच माझ्यावर प्रीती आहे, कांकीं जरी ह्या सर्वांनीं मला तुच्छ मानलें तरी, आई ! तूं मला आपल्या हृदयाकडे धरतेस. आई, तूं नसतीस तर या लोकांनीं माझे तीन तेरा केले असते. आई ! ! आतां तूंच मला सांग, मी काय करूं तें. "

आईला वाईट वाटलें आणि म्हणाली "बाळा, धोंड्या, तुझें नशीब तसें आहे त्याला मी काय करूं ?"

"मग मी काय केलें असतां आई माझें नशीब फिरेल ?"

"बाळा, ज्यानें तुला जन्म दिला त्या जन्मदात्या परमेश्वराकडेच जा आणि विचार. त्याकरतां जंगलांत जाऊन ध्रुवबाळासारखी खडतर तपश्चर्या कर आणि त्याला आपलासा करून घे. नंतर त्याला तुझा प्रश्न विचार."

दगड आईची आज्ञा घेऊन जंगलांत तपश्चर्येला बसला. उन्हाळा गेला, पावसाळा गेला, हिंवाळा गेला, किती वर्षें गेलीं याचा त्याला पत्ताच नव्हता. स्वतःची थोडथोडी झीज होऊं लागली, अंगावर गवत उगवलें तरी आपल्या तपश्चर्येपासून तो ढळला नाही. देवाला वाईट वाटलें आणि तेथें देव एकदम प्रगट झाले. देवानीं दगडास विचारलें, "बाळ, तूं असा का बसलास ? ज्याची तूं तपश्चर्या करीत आहेस तो मी तुझ्यासमोर उभा आहें. सांग पाहूं तुला काय पाहिजे तें !"

देवा ! खरच कां रे तूं मी मागितलेलें देशील ? कीं तूं माझी थट्टा करीत आहेस ?

देवः—बाळ, तुझी मी थट्टा करणार नाहीं. तुझी तपःश्चर्या, एकनिष्ठपणा, श्रद्धा व सबुरी पाहून मी खूष झालों आहें. तुला काय हवं आहे तें तूं खुशाल माग.

दगडः—देवा ! तुला जर मला द्यावयाचें असेल तर माझ्यांतला दगडपणा काढून त्यांत देवकळा निर्माण कर.

देवाला त्याच्या या मागण्याचा पेंच पडला. देव त्याला म्हणाला, "बाळ, त्याकरतां फार तपःश्चर्या करावी लागेल. एखादेवेळेस तुझे हात, पाय, मुंडकेसुद्धां अर्पण करावें लागेल. आहे का तुझी तयारी ?"

दगडः—देवा, जर तुझ्या दर्शनाकरितां एवढी तपश्चर्या केली आणि आतां तर माझ्यांत 'देवकळा' उत्पन्न होणार आहे, मग देवा त्याला—"देह जावो अथवा राहो." कांहीं हरकत नाहीं, तयारी आहे.

देवः—"बरें, तुझ्यांत देवकळा उत्पन्न करतों."

असें म्हणून देव गुप्त झाले व शिल्पकारानें त्या दगडाची सुंदर विठोबाची सुंदर नयनमनोहर मूर्ति बनविली. त्या दगडाच्या मूर्तीलाच आतां सर्व शरण जात आहेत. पाणी, फुलें इतकेंच नव्हे तर माणूस सुद्धां या मूर्तिच्या सेवेला नेहमीं तत्पर असतात.

दगडाला देवपणा तर आला पण बुद्धीच्या आणि वाचेच्या माणसांत देवपण तर राहोच पण माणुसकीसुद्धां आली नाहीं म्हणून वाईट वाटलें, आणि त्यांच्यांत माणुसकी येण्याकरतांच सद्गुरु साईनाथांसारख्या सिद्ध विभूति निर्माण झाल्या.

शिरडीग्रामीं हजारों माणूस जात येत आहेत. त्यांना श्रीसाईबाबांचे अनुभवसुद्धां येत आहेत, परंतु आपले अनुभव श्रीसाईलीला मासिकांत प्रसिद्ध करण्याची त्यांना बुद्धि

होत नाहीं हें विशेष आहे. जास्त काय लिहूं ! आपण सर्व एकाच झाडाचीं फळें आहोंत, हें न विसरतां सर्वांनींच फांद्यांना पाणी न घालतां मुळाला पाणी घालावें ही ह्या संपादकाची आपणांस नम्र विनंति आहे.

संपादक

---

# ' साई–प्रभाव '

## ( १ )

मु. शिरडी
ता. १८–६–४९

श्री. रा. रा. डॉक्टरसाहेब गव्हाणकरशेट यांस—

श्रीक्षेत्र शिरडीहून माधवराव भाऊराव घुगे यांचा साष्टांग नमस्कार; पत्रास कारण कीं, माझी तब्येत महिना दीडमहिना बरी नसल्यानें श्रीसाई चरणापाशीं शिरडीस रविवारीं आलों आहे. येथें श्रीसाईनाथ प्रभुपुढें श्रीगुरुचरित्रसारामृत ग्रंथाचा सप्ताह सुरू आहे. उद्यां रविवारीं सप्ताह संपल्यावर आम्हीं मुंबईस येणार आहोंत. हें पत्र आपली आठवण करून खास आपणांस लिहिण्याचें कारण म्हणजे श्रीसाईंनीं आम्हीं शिरडीस येतांना एक चमत्कार दाखवून आम्हां सर्व मंडळींस शिरडीस कसें सुखरूप आणून पोंचविलें, ही हकीकत आपणांस कळावी; हें होय.

माझी तब्येत चांगली नसल्यानें एकदां शिरडीस जाऊन यावें असा विचार मनांत आला. बरोबर आमच्या शेजारील साईभक्त दामोदर पतंगे ( उर्फ दामूअण्णा ) हेही येण्यास तयार झाले. तेव्हां ताबडतोब रात्रींचेच गाडीनें निघण्याचा विचार केला. नागपूर मेल बोरीबंदरला धरावी असें आमचें ठरलें. श्री. साईभक्त रा. फडके मामा यांनींही बोरीबंदरलाच जाऊन गाडी पकडावी असा सल्ला दिला. परंतु त्याप्रमाणें आमचें निघणें लवकर झालें नाहीं. त्यामुळें दादरलाच गाडींत बसण्याकरतां थांबावे लागलें. दादर स्टेशनमध्यें तर चिक्कार गर्दी होती. आम्ही अगदीं पुढें एंजिनजवळ उभे होतों. एवढ्या गर्दींत आपणांस जागा मिळणें शक्य नाहीं असें वाटूं लागलें. पण कल्पना नसतांही बसायला व झोंपायला त्या गाडींत आम्हांला, जणूं काय रिझर्व केल्याप्रमाणें जागा मिळाली. ही बाबांचीच कृपा होय.

आम्हीं पहांटे ४॥ वाजतां मनमाड स्टेशनवर उतरलों. तिकिटें कोपरगांवचीं असल्यानें कोपरगांवला जाणारी गाडी पकडण्यासाठीं आम्ही २ नंबरच्या प्लॅटफॉर्मवर गेलों तर त्या गाडीला इतकी चिक्कार गर्दी होती कीं आपणांस उभे राहण्यास जागा मिळणें शक्य नाहीं असें वाटूं लागलें तेव्हां नाइलाजास्तव सेकंड क्लासांत मंडळीस बसवून आम्ही ( मी व दामोदर पतंगे ) आमचीं थर्ड क्लासचीं तिकिटे बदलून सेकंड क्लासची

घेण्याकरितां स्टेशनमास्तरकडे गेलों. स्टेशनमास्तरनें आम्हांस सांगितलें, "तुम्हीं या भानगडींत पडूं नका. आज कोपरगांवला जाणारी गाडी कॅन्सल होणार आहे, गाडीच जाणार नाहीं. तेथें तिकिटें बदलून काय उपयोग ?" नंतर आम्ही ताबडतोब मोटार स्टॅंडवर जाऊन मोटारची तिकीटें काढलीं व मोटारींत बसलों. इतक्यांत कॅन्सल झालेल्या गाडीची गर्दी मोटार स्टॅंडकडे वळली पण मोटारच्या सीट मर्यादित असल्यानें पुष्कळ जणांस तेथेंच मुक्काम करावा लागला. अशा रीतीनें श्री साईच्या लीलेचें कौतुक करीत आम्हीं सकाळीं सव्वाआठ वाजतां शिरडीस सुखरूप पोहोंचलों. असो, आतां माझी प्रकृति उत्तम आहे; बाकी सर्व ठीक. सर्वत्रांस नमस्कार क. हे. विनंति.

आपला नम्र,

**मा. भा. घुगे**

---

# ॥ श्रीसाईप्रसन्न ॥

मुंबई ता. ५-९-४९

संपादक **साईलीला** यांसी,

स. न. वि. वि.

मी एक साईबाबांचा सेवक आहे, व मी बाबांच्या सेवेला कसा लागलों त्याची पूर्वपिठीका देत आहे. हा मजकूर आपल्या मासिकांत प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

## श्री साईबाबांची ओळख

सुमारें तीन वर्षांपूर्वी एके दिवशीं माझे घरीं भिवपुरी साईसमाजमधले श्री. जे. जे. देशपांडे हे आले. त्यांनीं श्री बाबांच्या कृपेनें आपले सर्व मनोरथ पूर्ण होतील असें सांगितल्यावरून माझा त्यांचे बोलण्यावर विश्वास बसून मी श्री साईबाबांची सेवा तन, मन, धन, वेंचून करूं लागलों. नंतर सुमारें दोन महिन्यांनीं मी बाबांची पूजा करीत असतां श्री. सावंत महाराज हे अगातूक माझे घरीं आले. व माझी बाबांवरील निष्ठा पाहून त्यांनीं सांगितलें कीं, बाबांचे कृपेनें तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील, एवढें म्हटल्यानंतर त्यांनीं माझ्या पत्नीची फळांनीं ओटी भरली. त्या दिवसांपासून माझी साईबाबांवरची निष्ठा अधिकच वाढली. त्यानंतर बाबांनीं मला निरनिराळ्या मार्गांनीं माझ्या सेवेचे व श्रद्धेचें चीज करून दिलें त्याचें पूर्णपणें स्पष्टीकरण पुढील अंकीं करीनच...

आपला,

**द. वि. भिसे,**

हिरा बिल्डिंग, हसाळीटॅंक रोड

दादर, मुंबई १४.

---

# " श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईनाथ प्रसन्न "

॥ अनन्याश्चिंतयन्तो मां येजनः पर्युपासते ॥
॥ तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमवहाम्यहम् ॥ (भ. अ. ९ श्लोक २२,
॥ हा योगक्षेमु आधवा ॥ तयांचा मजाचि पडिला पांडवा ॥
॥ जयांचिया सर्वभावा ॥ आश्रयोमि ॥ (ज्ञा. अ. ९ ओवी ४३ )

आपले सर्वभाव परमेश्वराचे ठिकाणीं अर्पून, मनुष्याला स्वतःच्या कर्तबगारीचा, त्याच्या सर्वस्वाचा किंबहुना त्याला त्याच्या स्वतःचा ज्या क्षणीं विसर पडतो, व तो परमेश्वराला आपलें सर्वस्व मानून जेव्हां एकचित्तानें तो त्याला अनन्य भावानें शरण जाऊन त्याच्याकडून होणाऱ्या घटनेकडे माझें सर्वस्वी हितच सांठविलेलें आहे अशा भावनेनें जेव्हां तो तद्रूप होतो व स्वतःच्या बऱ्यावाईटाचा यत्किंचित देखील विचार करीत नाहीं त्यावेळीं परमेश्वर त्याचें सर्व ऐहिक व पारमार्थिक बाबतींत स्वयंप्रकाशित होऊन ( परमेश्वर स्वयंप्रकाशितच आहे. ) म्हणजे तो स्वयंप्रकाश दाखवून सर्व कार्य करतो.

वरील विवेचनावरून साईभक्तांना 'बाबांची' सेवा कशी करावी याचा ऊहापोह करण्याचें मला प्रयोजन नाहीं, व तो अधिकार माझेकडे घेण्याची माझी पात्रता नाहीं. मला स्वतःपुरतें एवढेंच सुचित करावयाचें आहे कीं वरील श्लोक रूपांतरींत ओवी हें सर्व श्री. साईबाबांचेंच वचन आहे. आम्हां निस्सीम साईभक्तांना जगांत श्रीसाईबाबांच्या व्यतिरिक्त दुसरा देव नाहीं. ( देव एकच आहे. त्याचीं रूपें अनंत आहेत. ) म्हणजे आमचें चित्त दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं विचलित होऊं शकत नाहीं. ऐहिक, पारमार्थिक, सामाजिक, राजकीय कोणत्याही क्षेत्रांत मार्गदर्शन करणारा एकाच स्वरूपाचा एकच एक परमेश्वराचा अवतार श्री. साईनाथ आहेत त्याचें विस्तृत विवेचन केल्यास कित्येक पानें लिहावीं लागतील. प्रस्तुत प्रसंगीं स्थलाभावीं मी तो मोह आवरून माझे स्वतःचे श्रीच्या चरणीं ठेविलेलें सुखदुःखाचें गाठोडें उघडें करून दाखवितों. व ते जिज्ञासू व मुमुक्षु आपआपल्या परीनें निरीक्षून तत्त्व संग्राही धरतील असें समजून माझ्या अनेक अनुभवांपैकीं दोन अनुभव वरील भगवंताच्या वाणीचा सप्रमाण गौरव करतील.

माझी सांपत्तिक परिस्थिति फार हलाखीची व मी कुटुंबाचा एकुलता एक कर्ता सवरता आधारं हल्लींच्या महागाईच्या दिवसांत रेशनाचें धान्य आणण्यास जवळ एक पैसा नाहीं. घरांत धान्य नाहीं. चहा करायला साखर नाहीं. अशा परिस्थितींत कुठें पैसे मिळण्याची सोय नव्हती व अगदींच लाचार होऊन कुठें याचना करावयास जाण्यासाठीं मन तयार होईना. कारण मी फार स्वाभिमानी मनुष्य आहें. गत आयुष्यांत कधींहि लाचारी केली नाहीं व आतां तो प्रसंग आल्याबरोबर जिवाला मरणप्राय दुःख झालें व मनाचा निर्धार केला कीं कोठेंही याचना करावयास जायचें नाहीं. आठवड्याच्या रेशनचा सरता दिवस व सरती वेळा, बाबांच्यावर भार टाकून स्वस्थ बसलों. मन उद्विग्न,

घरांत उदास वातावरण, इतक्यांत माझ्या बहिणीच्या सासुरवाडचा एक नातेवाईक गृहस्थ सहज आला. माझ्याकडे आलेला कोणीही मनुष्य गृहस्थधर्माप्रमाणें व सद्यःचाली रीतीप्रमाणें संभावना केल्याशिवाय जात नसे व त्याचप्रमाणें भिक्षुक किंवा अतिथि विन्मुख पाठविला जात नाहीं. असो. पाहुण्याच्या आगमनानें आमच्या मातोश्रींस फार खेद वाटला. साहजिकच्च आहे, नेहमींच्या वागणुकींतील फरक पाहुण्याला समजल्यास त्याचा गैरसमज होणार तेव्हां निरुपायास्तव मातोश्रीला परिस्थितीचा खुलासा करणें भाग पडलें. मी कुठें मागावयास जात नाहीं हें सुद्धां सांगितलें. पाहुण्यानें ताबडतोब आवश्यक ते पुरते पैसे त्याचे जवळ न मागतां तो देऊन चालता झाला. मी त्याला किती सांगितलें कीं आपले पैसे ठेवा पण तो तें न ऐकतां निघून गेला व परत पैसे घेण्याकरतां आला नाहीं.

अशाच परिस्थितींमध्यें असतांना माझी दीड वर्षांची मुलगी फार आजारी झाली. ताप १०३, १०४ डिग्री असे. औषध आणण्यास पैसे नाहींत ' बाबाची उदी देऊन स्वस्थ राहिलों. ताप कमी होईना मुलगी निचेष्ट पडली होती. शरीराचें चलनवलन मंदावलें तेव्हां पत्नीच्या डोळ्यांत अश्रू येऊन ती मला म्हणाली कीं, " कुठूनही पैसे आणून डॉक्टर आणावा नाहींतर चिन्ह ठीक दिसत नाहीं, पैसे आजचे उद्यां मिळतील पण मुलगी गेली तर आपण हयगय केल्याबद्दल जन्मभर आपलें .मन आपल्याला खात राहील " मी विचार केला. कुटुंबाचा प्रमुख या दृष्टीनें मी त्यांचा सेवक आहें. माझ्या कर्तव्याला मला जागलेंच पाहिजे. परमेश्वर आपल्याला निष्क्रीय राहण्यास सांगत नाहीं, कर्तव्य करीत असतांना परमेश्वराचें सहाय्य मागणें हा मनुष्याचा धर्म, परमेश्वरानें मनुष्याला बुद्धि, धडधाकट इंद्रियें दिलीं आहेत ती त्यांचा उपयोग करण्याकरितां आहेत. दुबळे होण्याकरतां नाहींत. असो रविवारचा दिवस, संध्याकाळची वेळ. पैसे आणि नंतर डॉक्टर दोन्ही मिळविण्याकरितां बाहेर पडलों. पैसे मिळाले व डॉक्टरकरतां एका गृहस्थांना मध्यस्थी घातलें. ते डॉक्टर धंद्यांत नाणावलेले वयस्क व जवळच राहणारे तेव्हां माझ्या मतें तेच डॉक्टर येऊन तपासतील तर बरें होईल असें होतें. परंतु रविवार संध्याकाळची वेळ, येतील किंवा नाहीं, निश्चित कळणें कठीण म्हणून त्यांच्याच परिचयाचा मनुष्य त्यांना बोलावण्याकरतां योजला व ते आले. तपासल्यानंतर मला म्हणाले, " औषध कुणाचें देतां " मी म्हणालों, " कुणाचें नाहीं " त्यांना आश्चर्य वाटलें. सुशिक्षित मनुष्य अशा आजारीपणांत औषध दिल्याशिवाय राहतो. ते गंभीर होऊन म्हणाले, " मुलीला डबल न्युमोनिया झाला आहे व प्रकृति चिंताजनक आहे. करितां छाती व पाठ यांना अँटीफ्लॉजिस्टीन लावा व औषध द्या. परंतु माझा दवाखाना मुंबईस आहे व मजजवळ कसलेंच औषध नाहीं करितां अमूक अमूक गोळ्या अमूक अमूक प्रमाणांत द्या " असें म्हणून ते निघाले. तेव्हां मी त्यांची व्हिजिट फी देऊं लागलों. ते म्हणाले, " मी पैसा घेणार नाहीं इतकेंच नव्हे तर परत मी सकाळीं येऊन तपासून जाईन व रात्रीं मध्यरात्रीं केव्हांही जरूर पडल्यास मला बोलवा. मी आनंदानें येईन, पुढें मुलगी साफ बरी झाली

ती सुद्धां शेजारी पुढें होऊन पाहिजे असलेल्या औषधी पुरवून व त्या मी न मागतां डॉक्टरांची व माझी तोंडओळख देखील नव्हती व आतांसुद्धां ते ओळखणार नाहींत तरीसुद्धां मोबदल्याशिवाय त्यांनीं मला जें सहाय्य केलें; ती बाबांची प्रेरणा नव्हे काय? येथें एक गोष्ट नमूद करावी असें वाटतें ती ही कीं, मी केवळ अपत्यप्रेमानें डॉक्टरच्या शोधास निघालों नाहीं, तर ज्या परमेश्वरानें मला कुटुंबाचा भारवाहक म्हणून नेमिलें आहे, त्या परमेश्वराचा मी जर बाहेर न पडून, औषधोपचारासारखें माझें कर्तव्य केले नाहीं तर मी त्याचा गुन्हेगार ठरेन ही मनाची प्रमुख भावना होती. असो मला माझ्या कोणत्याही हलाखीच्या परिस्थितीबद्दल विषाद न वाटतां अभिमान वाटतो कारण कोणत्याही कोट्याधिश मनुष्याला, मला मिळणाऱ्या "बाबांच्या" प्रेमाचा, व अध्यात्मिक सुखाचा ओलावा मिळणें दुरापास्त आहे.

साईनाथार्पण,<br>
साईभक्तांचा दास<br>
**वसंत वामन प्रधान**<br>
दादर, मुंबई.

---

"Om Shri Sai Samarth"

*From*

**S. B. Jamkhandi, Post–Master,**<br>
**Hubli.**

To,

The Editor. "Shri Sai Leela"

Sir,

I shall be highly oblieged to you, if you will kindly favour me by publishing the following "Shri Sais Leela"–our experiences—in the next issue of Shri Sai Leela Quarterly Magazine for the good of all humanity in case by reading the same. One or two individuals from themeselves Godword, my. little effort of writing this is faithfull.

My sister-in-law Tulasabai ( भावजय, भाची ) was suffering from ulcerated tongue for the last twenty years. All kinds of medicines and Pathyas were tried and failed. She gradually contracted Anemia and further neurasthenatic, with the result that she grew very weak and palpitation

started. She is the only female elderly member in my house. ( I am a widower having lost my wife since fourteen years ) As her condition and state affair worsened, she began loosing all hopes of her earthly life and to end the agony of the desease. Desired and requested all to give her some poison. We were in the family very anxious about her health. At this critical movemet probably in February 1947. I happened to see a copy of "Sri Sai Sudha" publishing in Madras and Easually happened to read. Some experienses of devotees, who by their faith in Him god cured some old diseases of colicy pains of twelve years duration, by simply applying "Udimai" and "Jap" of "Shri Sai Nama" of twelve hundred daily. I there upon requested my sister in law to start Nam Jap of Shri Sai offen narratting the experiences of the devotees I also sent a money order to Shirdi for Udimai. She flatly refused to chant any Namasmaran and instead requested to end her miserable life by administering Something (poison) I with my daughter Vimal started then chanting Babas name of twelve hundred each singing on her bed with photo of Shri Sai Baba kept near her bed. By the end of a week her neurasthenetic tendency grew less day by day. Though bedridden and extremply weak, she asked us not to take any trouble on her account, but instead she would do her allotted numbers of Nama Japa her self. Within a fortnight she could stand on her legs and do her house full duties. This, to see, was simply meraculous change in her of whom we had lost all hopes :—brought by the grace of Shri Sai Baba. This impressed much my whole family members, and we all started reguler Grand pooja of Shri Sai on every thursday. She is now at her age of 53 years, Strong enough to manage the family affairs of ten to twelve members. (other experiences will be shortly published in the next isuses.)

# ॥ श्री दत्तचित्साई सद्‌गुरुभ्योनमः ॥

शिरडी येथील नेहमीं निवास करीत असलेल्या मशिदीला बाबा द्वारकामाई कां म्हणत याबद्दलचें संशोधन—

[ मागील दोन अंकांवरून पुढें चालू ]

आतां या दोन स्थलांतून कोणत्या स्थलांना आख्याइकांचा व निसर्गाचा पुरावा ( प्रमाण, पाठिंबा ) मिळतो तें पाहूं.

शके १८५७ च्या रामनवमी उत्सवांत संवत्सर गांवचे एक भटजी वे. मू. रा. गंगाधर भट पाठक श्रींच्या समाधीर अभिषेक करण्याकरितां आले होते. त्यांना दक्षिणा देते वेळीं मी त्यांना सहज विचारलें कीं, तुमच्या गांवाबद्दल तुम्हांला कांहीं दंतकथा. इतिहास किंवा आख्याइका माहित आहे का? असल्यास मला सांगा. ते म्हणाले, आमचा संवत्सर गांव पुणतांब्याजवळ जें संवत्सर स्टेशन आहे, तेथून ६ मैल लांब असून तो श्री गोदावरी तीरावर वसलेला आहे. गांवापासून जरा अंतरावर पण गोदातटींच श्रीशृंगेश्वर महादेवाचें फार पुरातत स्थान आहे. आमच्या गांवच्या समोर गोदावरीच्या दुसऱ्या तीरावर कोकमठाण म्हणून गांव आहे. कोपरगांवाहून संवत्सर ३ मैल लांब आहे. या दोन गांवांच्या दरम्यान दुसऱ्या दोन लहान नद्या आहेत, एकीचें नांव नारदा व दुसरीचें नांव गारदा असें आहे. नारदा नदी ही संवत्सर गांवापासून एक मैल पश्चिमेला आहे. ती संवत्सर बाजूनें शृंगेश्वर महादेवाच्या स्थानापासून थोड्या अंतरावर गोदावरीला मिळते. गारदा नदी कोकमठाणच्या बाजूनें नारदा नदीच्या समोरच गोदावरीस मिळते.

याच नारदा नदींत नारदाची नारदी झाली अशी येथें फार पुरातन आमच्या वाडवडिलांपासून आख्याइका चालत आली आहे, व नारदांना त्यावेळीं प्रभवविभवादि जीं साठ मुलें झालीं त्यांचीं साठ आसनें ( बसण्याच्या जागा ) गोदावरीच्या पात्रांत आहेत. त्यांपैकीं कांही नादुरुस्त आहेत व कांहीं अजूनही नजरेला पडतात. संवत्सरच्या नजीक कृष्णमंदिर आहे, पण तें महानुभाव पंथाच्या लोकांचें असून अगदीं अलीकडचें आहे.

त्यानंतर ता. ६ एप्रिल १९३६ रोजीं कै. श्री. बाबासाहेब तर्खड, श्री. रघुवीर भास्कर पुरंदरे, शिरडीच्या मराठी शाळेचे हेडमास्तर श्री. महाजन, श्री. बाळा पिलाजी गुरव, श्री. गंगाधर भटजी पाठक व मी अशी सहा मंडळी शिरडीहून निघून कोपरगांवावरून संवत्सर गांवच्या नजीक असलेल्या शृंगेश्वर देवालयाजवळ गेलों. श्रीगोदावरीच्या पात्राला लागूनच हें देवालय आहे. तेथें आम्हांस गोदावरीमाईच्या पात्रांत नारदा नदीच्या संगमापासून कोकमठाणच्या वडापर्यंत ओळीनें एक रेषेंत १८ आसनें दिसलीं. त्याचवेळीं गारांचा पाऊस ८-१० दिवस अगोदर याही भागांत पडला असल्यामुळें गोदावरीच्या पात्रांत बराच चिखल झाला होता. मी खेरीज करून बाकीची पांच मंडळी नारदा नदीच्या संगमावर गेली होती. ज्याअर्थी १८ आसनें गोदावरीच्या

पात्रांत स्पष्ट व स्वच्छ दिसताहेत, त्याअर्थीं बाकीचीं ४२ आसनें हीं तेथें असलींच पाहिजेत व तीं पाण्यांत व गाळांत दडून राहिलीं पाहिजेत, असा त्याचा अजमास झाला. कारण त्या वेळीं जरी गोदावरीच्या पात्रांत पाणी कमीं होतें, तरी नारदानदीच्या संगमाजवळ व आणखी इतर ठिकाणीं पाणी भरपूर व खोल होतें, व गाळही यथास्थित होता. त्यामुळें त्यांत दडून राहिलेलीं बाकीचीं ४२ आसनें दिसणें शक्य नव्हतें. पण या १८ आसनांवरून बाकीचीं आसनें तेथें असावीं असा आम्हां सर्व मंडळींचा दृढ समज झाला. नारदा, गोदावरी संगम व कोकमठाणचा वड यांत अंतर कमींत कमी दोन मैलांचें येईल. संगमाच्या वरचे बाजूकडे हीं आसनें नाहींत व वडाच्या खालच्या बाजूसही आसनें नाहींत. जीं आहेत, तीं वरील दोन मैलांच्या अंतरांतच आहेत. दोन आसनांतील अंतर सारखें नसून कमजास्त आहे. दोन आसनांची लांबी, रुंदी व उंची ही सारखी नाहीं. सर्व आसनें ( बैठका व चबुतरे ) नैसर्गिक खडकाचीं असून निरनिराळ्या रंगांचीं आहेत. दोन आसनांमधील अंतर सरासरी शें–दिडशे फुटांचें तरी असेल.

शृंगेश्वर मंदिरासमोरील आसन अप्रतिम व अत्यंत प्रेक्षणीय आहे. हें आसन पंचरंगी आहे. हे रंग अगदीं ताजे दिल्याचा भास होतो. पण ते नैसर्गिकच आहेत. सर्व आसनें एका नमुन्याचीं नाहींत निरनिराळ्या साच्याचीं आहेत. प्रत्येक आसन अजमासें १५–२० फूट लांब, १०–२० फूट रुंद व २–३ फूट उंच आहे.

कोकणमठाणच्या वडाजवळ एक देवी आहे. तीही फार पुरातन आहे. मूर्ति नाहीं, तांदळा आहे. नैसर्गिक दगडाची आहे कृत्रिम नाहीं. ही एकसष्ठावी कपिलाषष्ठी असावी असे वाटतें. या देवीसंबंधानें कांहीं दंतकथा किंवा इतिहास नाहीं. पण दरसाल वैशाख महिन्यांत येणाऱ्या अक्षय्य तृतीयेपासून पांच दिवस कोकमठाणच्या व संवत्सरच्या जवळ हजार दीड हजार लोक एकमेकांविरुद्ध आज कित्येक शतकें तीर–कमठ्यांनीं, गोफणगुंड्यांनीं, नुसत्या साध्या दगडांनीं, लोखंडी बोंडाच्या काठ्यांनीं व ढालींनीं गोदावरी पात्रांतील वाळवंटावर आपआपल्या गांवच्या तीरावरून लढाई खेळत असतात. म्हणजे ही एक पर्वणी समजून दोन्हीं गांवच्या देवांचा उत्सवच होतो असें दिसतें. लढाईत संवत्सरचे लोकांचा विजय झाला, म्हणजे ते म्हसोबाकी जय अशी मोठ्यानें गर्जना करतात. कोकमठाणच्या लोकांचा जय झाला तर ते लक्ष्मी आई की जय अशी गर्जना करतात.

कपिलाषष्ठी ही साठ वर्षांनीं म्हणजे विभवप्रभावादि साठ संवत्सरें संपलीं म्हणजे ६१ व्या वर्षीं येते असें सर्व विश्रुत आहे. यावरून ती नारदांचीच कन्या, साठ संवत्सर झाल्यानंतर झाली असावी असं वाटतें. याबद्दल पुराणांत मला अद्याप आधार सांपडला नाहीं. पण कै. बापूसाहेब करंदीकर यांनीं मला सांगितलें कीं, कपिलाषष्ठी ही नारदाचीच मुलगी आहे व ही कथा पद्मपुराणांत आहे. पण पद्मपुराण मला अद्याप वाचावयास मिळलें नाहीं. साठ पुत्र झाल्यावर एकसष्ठावी ही कपिलाषष्ठी कन्या नारदांना आली असावी व तीच कोकमठाणचे वडाखालील देवी असावी असें अनुमान निघतें.

व्रतराज ग्रंथांतील कपिलाषष्ठीसंबंधाचा उतारा खालीं देत आहे. त्यावरून येथें म्हणजे या भागांत पूर्वी द्वारका होती असें दिसतें.

" भाद्रमास्य सिते पक्षे । षष्ठी भोमेन संयुता ।।
व्यतिपातेन रोहिण्या । सा षष्ठी कपिला स्मृता ।।
अविनस्य सिते पक्षे । महा पुण्य प्रवर्धिनी ।।
षष्टि संवत्सरस्यांते । सा पुन्स्तेन संयुता ।।
चैत्र वैशाखयोर्मध्ये । सिते पक्षे शुभोदये ।।
वैशाखेऽपिच राजेंद्र । द्वारवत्यां परास्मृता ।।

कपिलाषष्ठी या शब्दाचेंच अपभ्रष्ट रूप कोकमठाण असावें असें वाटतें. कपिला = कोकम, कुंकम. षष्ठी–स्थान, ठाण.

वरील लढाईत कित्येकजण जखमीही होतात. पण एकमेकांवर ते कधींही फिर्याद करीत नाहींत. इतकेंच नव्हे, तर कोणी गरीब असून जखमी झाला. तर सर्व लोक वर्गणी करून त्याच्या औषधपाण्याची सोय करतात. ही लढाई कां खेळतात ह्याचें कारण समजत नाहीं. पण फार पुरातन कालापासून ही वहिवाट आहे. यावरून ही लढाई म्हणजे कोकमठाण देवीचा म्हणजे कपिलाषष्ठीचा वार्षिकोत्सव आहे व तो वर लिहिल्याप्रमाणें वैशाख शुद्ध ३, ४, ५, ६ व ७ या दिवशीं होतो व वैशाखांत कपिलाषष्ठी मानण्याची पुरातन चाल फक्त द्वारकेंतच होती व ती कोकमठाण व संवत्सर याच ठिकाणीं दृष्टीला पडते. यावरून पूर्वी एका काळीं द्वारका या भागांत होती असें अनुमान निघतें. नारदांना जेव्हां स्त्रीचें वेड लागलें, तेव्हां तेच स्त्रीरूप झाले, व स्नान करून वरती येतात तोंच.

" तेथें एक पुरुष आला साचार। कामातुर होऊनियां ।। ४५ ।।
तेणें संग देतांचि तात्काळ । गरोदर झाली वेल्हाळ ।।
नवमास भरतां समूळ । प्रसूत झाली तेधवां ।। ४६ ।।

—हरिविजय

हा पुरुष कोण अशी शंका येते. पण मला वाटतें हा पुरुष श्रीकृष्ण परमात्मापेक्षा दुसरा कोण असणार ? कारण त्यांनींच आपल्या अगम्य करामतीनें नारदांची नारदी केली अर्थात् तिचा काम शांत करण्याकरतां आपणच त्या ठिकाणीं लागलींच कामातुर पुरुष बनले, व तिला संग दिला.

आतां येथें जशा नारदी, नारदानदी, संवत्सर गांव, साठ संवत्सरांचीं आसनें वगैरे गोष्टी जुळून आल्या, तसें येथें ज्यानें नारदीला संग दिला त्या श्रीकृष्ण परमत्म्याचें निदान मंदिर तरी पाहिजे. पण मजेची गोष्ट अशी कीं कोकमठाण गांवांत नदीच्या किनाऱ्यावर एक फार पुरातन दगडी असें श्रीकृष्णाचें मंदिरही आहे. त्याला दामोदर मंदिर असें म्हणतात. तेथें असलेल्या एक–दोन मूर्तीखंडावरून असें दिसतें कीं,

मंदिरांतील दामोदरमूर्ति प्रथम काळ्या घोंटीव दगडाची असावी. पण पुढें ती कोणी तरी व केव्हां तरी मुद्दाम फोडली असावी किंवा कांहीं कारणानें नाहींशी केली असावी. हल्लीं त्या मंदिरांत जी मूर्ति आहे ती निरनिराळ्या दगडाची असून ती कालिया सर्पानें वेढे घातलेली अशी कृष्णाची मूर्ति आहे. कांहीं असो. नारदीला संग देणाऱ्या पुरुषाचें ( श्रीकृष्णाचें दामोदराचें ) मंदिर पण तेथें आहे. हेंही मंदिर श्री. पुरंदरे, बाळा गुरव, मी, माझें कुटुंब व ज्येष्ठ भगिनी आऊताई व देशपांडे–स्नुषा सौ. राधाबाई अशा सहा मंडळींनीं ता. २३-४-३६ रोजीं कोकमठणला जाऊन पाहिलें. गांवचे वृद्ध लोक तेथें आले होते. पण कोणालाच या देवाचा, व देवालयाचा इतिहास अथवा अख्याइका माहित नसल्याचें कळलें.

हें मंदिर अति जुनें असून दगडाचें आहे, व तें गोदावरीस पुरातन बांधलेल्या अनंत घाटावर आहे. ह्या घाटाचें नांव हीं दामोदर मंदिराची किंवा कृष्ण मंदिराची साक्ष पटवीत आहे.


ह्या मंदिरावर नक्षी व चित्रें कोरलीं आहेत. दामोदर मूर्ति चतुर्भुज आहे. चार हातांत अनुक्रमें शंख, चक्र, गदा व पद्म अशीं आयुधें आहते. ही मूर्ति तीन–साडेतीन फूट उंचीची लहान तरुण वयाची आहे, अंगावर लेणीं आहेत, कालिया सर्पाचा वेढा सर्व अंगाला दिला आहे, डोक्यावर मुकुट आहे. व मुगुटाच्या मागील बाजूकडून कालिया सर्पाची फडा मुकुटावर आली आहे; दामोदर मूर्तीच्या पायाखालीं दोन मूर्ति आहेत. एक पुरुषाची व एक स्त्रीची. स्त्रीच्या डोक्यावर दामोदरांनीं आपली गदा मारली आहे. पण ही मूर्ति अलग असून भंगलेली आहे. गाभाऱ्याच्या दरवाजावर गदडाची मूर्ति आहे. व मंदिराच्या दरवाजावर दोन्ही बाजूंला ज्या अनेक लहान मूर्ति आहेत, त्यांत जयविजयांच्या मूर्ति आहेत. उजव्या बाजूला देवांची मूर्ति आहे. या देवीची माहिती वराह पुराणांत आहे; या पुराणांत या गांवाला कोकामह असें नांव दिलें आहे, असें मला एका भटजींनीं सांगितलें. मी वराहपुराण संगमनेर येथें वाचलें. पण मला त्यांत ही माहिती मिळाली नाहीं.

या दामोदर मंदिरांत अलीकडे कोणीतरी एक शंकराची दिंडी व नंदी बसविला आहे; पण या मंदिराला कोणीं शिवालय, शिव मंदिर किंवा शंकरालय म्हणत नाहींत. दामोदर मंदिरच म्हणतात.

गारदानदी संबंधानें इतिहास किंवा आख्याइका उपलब्ध होत नाहीं; तरीपण कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, नारद नारदा नदींत स्नान केल्याबरोबर स्त्रीरूप नारदी झाले. पण त्यांना त्या स्त्रीरुपाचा व संसाराचा कंटाळा येऊन अनुताप झाला, तेव्हां त्यांनीं गारद नदींत स्नान केलें व त्यामुळें त्यांना पूर्ववत पुरुषरूप प्राप्त झालें. म्हणजे संसारतप्त झालेल्या नारदाला ज्या नदीच्या स्नानापासून गारपणा ( थंडता, शीतलता, शांतता ) मिळाला ती गारदा. गार थंड. थंडपणा देणारी ती किंवा गारपणा देणारी किंवा गार करून सोडणारी ती गारदा. पण यांत गार शब्द मराठी व दा शब्द संस्कृत म्हणजे हा

खेडगुजरी समास होईल. तथापि स्त्रीरुपाच्या तापापासून मुक्त होणारी ती शारदा असा या खेडगुजरी समासाचा अर्थ मात्र होऊं शकेल. असो. त्याबद्दल विद्वान तज्ञ संशोधकांनीं स्थळ पाहून विचार करावा.

मला पंढरीमहात्म्य नुकतेंच शिरडीस वाचावयास मिळालें. त्यावरून वरील अनुमानाला चांगलीच बळकटी येऊन त्यांतील बऱ्याचशा स्थलांच्या जागेचा व अर्थाचा खुलासा व उलगडा होतो.




**श्री रुक्मिणी मातुःश्रींची दिंडीरवनांतील तपश्चर्येची जागा व त्या वनाची मर्यादा.**

पाहूनिया एकांत स्थान ॥ तप मांडिले दारुण ॥ मज शोधाया जगज्जीवन ॥ येईल आपण या ठाया ॥ १७ ॥ दंडकारण्य गोदातीर ॥ तिच्या उत्तरेस तीर्थ सुंदर ॥ त्याहून विशेष अपार ॥ दक्षिण दिशे तीर्थें असती ॥ १८ ॥ दक्षिण कोल्हापूर क्षेत्र ॥ काशीहूनी शतगुणी थोर ॥ तेथें राहतां अहोरात्र ॥ होय उद्धार प्राणियां ॥ १९ ॥ त्यांचे द्वादश योजनें पूर्वे ॥ कृष्णातीर सुंदर बरवें ॥ तें शूर्पाला क्षेत्र जाणावें ॥ अति उत्तम साजिरें ॥ २० ॥ त्यांचे उत्तरेस द्वादश योजने थोर ॥ दिंडीरवन महा घोर ॥ लोह दंड पूर्ण क्षेत्र ॥ नाम तयां जाण पां ॥ २२ ॥ षोडश गांवें गोदातीर ॥ त्याचे उत्तरेसि निर्धार ॥ क्षेत्राचे पश्चिमेस करवीर ॥ द्वादश योजनें नेमस्त ॥ २३ ॥ तया दिंडीरवनीं ॥ तप करी रुक्मिणी ॥ सर्व सौभाग्य कारणी ॥ तेथें रुसोनि बैसली ॥ २४ ॥ वेणुनादीं गोपाळ रिझवुनी ॥ पुढें एकलाचि चक्रपाणी ॥ प्रवेशला दिंडिरवनीं ॥ म्हणे येथें रुक्मिणी पाहे पां ॥ ३४ ॥ अगाध कल्पांच्या युगांतरीं ॥ उभा अठ्ठावीस द्वापारीं ॥ ते युगाची कृष्णावतारी ॥ तप करीत रुक्मिणी ॥ ४५ ॥ पंढरी म. अ. १

### त्या वनास दिंडीरवन व लोहदंड हें नांव कसें पडलें ?

त्या वनामाजी अद्भुत ॥ दिंडीरनामे असे दैत्य ॥ तो चालूं नेदी सूर्याचा रथ ॥ लोक समस्त पीडीतसे ॥ ५३ ॥ दिंडीर दैत्य आणि मल्लिकार्जुन ॥ यांचें सहस्र वर्षें युद्ध दारुण ॥ मग गदा प्रहारें करुन ॥ दैत्यासि मल्लिकार्जुन मारी ॥ ६७ ॥ माझ्या नामें करुन ॥ यासि म्हणती दिंडीरवन ॥ स्वामी तुवां ही येथें राहून ॥ हेंच वन उद्धरावें ॥ ६८ ॥ दिंडीरवनासि होता वर ॥ रुक्मिणी तप करी दुर्धर ॥ म्हणोनीयां श्रीधर ॥ उद्धरावया आला तेथें ॥ ७० ॥ अध्यय पहिला.

[ १ गदाप्रहार = ( लोखंडाच्या विवक्षित प्रकारानें बनविलेले काठीनें ) लोखंडाच्या काठीनें = म्हणून त्यास लोहदंड हें नांव पडलें.]

### पंढरपूर ( लोहदंड, दिंडीरवन ) दक्षिण द्वारका क्षेत्राची मर्यादा व व्याप्ति


पंढरीचें पूर्व द्वार ॥ त्रिविक्रम पवित्र क्षेत्र ॥ तेथीचा महिमा अपार ॥ कीती तरी वर्णावा ॥ १ ॥ त्रिविक्रम रक्षित द्वार ॥ दक्षिणद्वारीं शूर्पाल क्षेत्र ॥ अश्वत्थरुपी श्रीधर ॥ कृष्णातीरीं विराजे ॥ २ ॥ आतां पश्चिमेचें द्वार ॥ तें जाणिजे करवीर ॥ तीर्थें पवित्र साचार ॥ स्नानें उद्धार प्राणियां ॥ ३ ॥ आतां उत्तरेचें द्वार ॥ तें प्रवरा संगमी गौतमी तीर ॥ पूर्वाभिमूख तें सुंदर ॥ सिध्देश्वर देव तेथें ॥ ६ ॥ अ. ३

### परमात्मांनीं दक्षिण द्वारकेंत द्वारकेची संपत्ति आणली त्यांत सोळा सहस्र स्त्रियाही आणल्या होत्या.

द्वारकेची संपदा सकळीक ॥ पंढरीसी आणिली देख ॥ वामभागीं उभी सुरेख ॥ रुक्मिणी देव हासत ॥ २७ ॥ रुक्मिणीस पती समजाऊं आला ॥ आणिक कृष्ण नायकास कळला ॥ तोची पंढरीसी आला ॥ सोळा सहस्र पातल्या ॥ ३० ॥ द्वारका सागरीं बुडविली ॥

सुदर्शनावरी धरिली ॥ पंढरी अद्यापि रक्षिली ॥ तेणें सकळ विघ्न निरसे ॥ ३१ ॥ द्वारके भौवतें सुदर्शन ॥ रक्षित होतें अनुदिन ॥ तेथें सकळ यादव संहारुन ॥ द्वारका जाण बुडविली ॥ ३२ अ. ॥

परमात्माच्या सोळा सहस्त्र स्त्रिया इकडे आल्या व त्या इकडेच राहिल्या यावरून नारदाची नारदी इकडेच झाली या अनुमानास व नैसर्गिक पुराव्यास चांगली बळकटी




येते. सुरनदी किंवा भागीरथी म्हणजे गोदावरीच या अनुमानास ही सत्यता येते, व

इकडे पूर्वी द्वारका ( दक्षिण द्वारका ) होती ह्या म्हणण्याचीही सत्यता पटते व पंढरपूरच्या ( चार द्वारांचे ) मंडलांत किंवा घेरांत शिरडी हा द्वारकेचा भाग होता, हें पंढरी महात्म्यावरून स्पष्ट होतें.

**परमात्मास यावेळीं इकडे येण्यास कारणें झालीं तीं,**

१ श्रीरुक्मिणीमाईची समजूत करणें.

२ दिंडिरवनाचा उद्धार करणें.

३ भक्तशिरोमणी पुंडलिक यांना दर्शन देणें, व वर देणें.

पंढरपूर ( म्हणजे दक्षिण द्वारका ) च्या चारी द्वारांच्या मर्यादा क्षेत्रांवरून शिरडी हें ठिकाण दक्षिण द्वारकेच्या कक्षेंत येतें, हें सोबत जोडलेल्या नकाशावरून दिसून येईल.

पंढरीस पुष्कळ तीर्थें आहेत. त्यांत तीन मुख्य आहेत. बिंदुतीर्थ [ महाद्वारांत ] लक्ष्मीतीर्थ व सूर्यतीर्थ चंद्रभागेच्या वाळवंटांत. बिंदुतीर्थ गुप्त आहे. तें पांडुरंगाचें मूलस्थान, लक्ष्मीतीर्थ श्रीरुक्मिणी मातुःश्रींच्या तपश्चर्येचें ठिकाण व सूर्य तीर्थ हें श्रीपुंडलिकांच्या आश्रमाचें स्थान:आहे.

**भीमा नदीची उत्पत्ति कशी व कोठें झाली, व ती पंढरीस कशी आली व तिचें महत्त्व**

शिव म्हणे मृडानी ।। मी त्रिपुर दैत्यातें मर्दुनी ।। श्रम पावोनी विठ्ठल ध्यानी ।। भीमाशंकरीं बैसलों ।। १०१ ।। तप करितां अति दुर्धर ।। अंगीं चालिला धर्मपूर ।। तेचि भीमा साजिर ।। भीमरुपें धावली ।। १०२ ।। गडगडा ते गर्जत ।। आली पंढरीपर्यंत ।। तों पुंडलिकापुढें भगवंत ।। देखोनि विस्मित ते झाली ।। १०३ ।। जैसी विख्यात भागीरथी ।। तैसी भीमरथी पावनक्षिती ।। शिवें आपली ज्ञानभक्ती ।। तेणे प्रकटविली त्याच रुपें ही ।। १०६ ।। पुंडलिकाश्रमीं सूर्यतीर्थ । उभा पुढें लक्ष्मीकांत । कौतुक पहावया तेथ ।। भीमरथी पातली ।। १०७ ।।.

भीमा नदी ही दिंडिरवनाची किंवा दक्षिण द्वारकेची किंवा पंढरपूर क्षेत्राची मध्यरेषा आहे; हें सोबतच्या नकाशावरून दिसून येईल.

याच श्रीभीमरथीमाईच्या वाळवंटांत एक विष्णुपद म्हणून तीर्थ आहे. याच तीर्थाला वेणुनाद असें नांव आहे. कृष्णपरमात्मा पश्चिम द्वारकेंतून निघून गोकुळांत येऊन नंतर दक्षिणेंत रुष्ट झालेल्या रुक्मिणीमाईचा शोध व समजूत करण्याकरतां आले ते प्रथम त्यांच्याबरोबर असलेल्या लवाजम्याला वेणुनादीं ठेवून आपण एकटेच दिंडीरवनांत शिरले. नंतर त्यांची समजूत करून पुंडलिकांच्या इच्छेप्रमाणें त्यांनीं दिंडिरवनांत दक्षिणद्वारका स्थापन करून पंढरी हें त्यांचें केंद्र बनविलें, व वेणुनादीं स्वहस्ते काला करण्यास सुरवात केली, व तेव्हांपासून उत्तरेतील गोकुलपुरींतील काला दक्षिण द्वारकेंत पंढरींत वेणुनादीं होऊं लागला, व तोच काला बाबांनीं स्वहस्तें शिरडींत तीन प्रकारें त्यांच्या समाधि स्थितीपर्यंत करून दाखविला. नंतर श्री भीष्मशास्त्री बाळाबुवा, व

ह. भ. प. श्री. दासगणूमहाराज हे शिरडी हा दक्षिण द्वारकेचा भाग असल्यामुळें काला कीर्तन स्वरूपांत शिरडींत करूं लागले, असे दिसतें. ( श्रीसाई कालाकीर्तनाख्यान पहा. )

या काल्याच्या प्रथेवरून ही शिरडी ही द्वारका व बाबा हे कृष्ण असें सिद्ध होतें.

आतां विंध्यपर्वताच्या दक्षिण भागांत पूर्वी गोड पाण्याचा समुद्र होता, असें कै. विष्णुपंत करंदीकर यांनीं आपल्या ता. १७ ऑगस्ट १९३४ च्या केसरी पत्रांतील लेखांत लिहिलें आहे. तरी या गोष्टीला शिरडीचे बाजूस आणखी ही निसर्गाचा पुरावा आहे, असें श्री. माधवराव विष्णु सहस्त्रबुद्धे, इरिगेशन सब ओव्हरसिअर, कंत्राटदार, शिरडी विभाग यांचें म्हणणें समुद्र या भागांत ( श्रीगोदावरी व कृष्णामाई या दोन महानद्यांच्या मधील प्रदेशांत ) होता इतकेंच नव्हे, पण त्याचें मंथनही याच भागांत झालें असलें पाहिजे. समुद्रमंथन जें झालें तें गोड्या समुद्राचें म्हणजे क्षीरसागराचें झालें, व तें मुख्यत्वें अमृताकरतां झालें. तें देव व दैत्य यांनीं केलें. प्रथमच विष निघालें. तें ज्यांनीं घ्यावें त्यांनीं अमृत घ्यावे असें ठरलें. शंकरांनीं विष घेतलें. तेव्हां अमृत देवांच्या वांटणीला आलें. पण दैत्यांची इच्छा राहिली. दैत्य आपल्याला अमृत पचूं देणार नाहींत म्हणून विष्णूंनीं मोहनीरूप धारण करून दैत्यांना मोहिनी घालून आपण अमृत सर्व देवांना देण्याकरतां सिद्ध झाले. अमृत प्राशनाकरितां देवपंक्ति बसली. शंकर ( उर्फ म्हातारा देव ) सर्व देवांच्या शेवटीं बसले. राहू व केतु या राक्षसांना मोह आवरेना म्हणून ते विष्णूला व इतर देवांना न कळत देवांच्या पंक्तींत बसले व अमृत प्राशन करूं लागले. इतक्यांत ही लबाडी चंद्रानें व सूर्यानें विष्णूच्या नजरेस आणली, तेव्हां विष्णूंनीं सुवर्ण पात्रांनीं राहूचे शीर ( केतु ) छेदन केलें. तें राहूचें शिराविरहीतचें धड हल्लीं नगर जिल्ह्यांत राहुरी तालुक्यांत शिरडीपासून २५–३० मैल असणाऱ्या राहुरी गांवांत, असलेल्या राहूच्या मंदिरांत आहे. मी हें मंदिर समक्ष पाहिलें आहे, व राहुरीपासून सुमारें ८०–८५ मैल अंतरावर असणाऱ्या रतनगड गांवीं केतूचें मंदीर आहे. त्यांत केतूचें धडावांचून नुसतें शिरच आहे तें मी पाहिलें नाहीं. पण राहुरीचे व त्या भागांतील सर्व लोक ही दंतकथा सांगतात, व ही समुद्रमंथनकथा पद्मपुराणांत ८–९–१० व्या अध्यायांत दिली आहे, ती मी वाचली आहे; [ संस्कृत प. पुराण व्हॉल्यूम २ श्री. कै. म. चि. आपटे यांनीं पुणें आनंदाश्रमांत सन १८९४ सालीं छापून प्रसिद्ध झाला आहे तो पहा. ]

रतनगड या नांवाची उत्पत्ति ही आपल्या मुद्याला पोकळच आहे. प्रवरा नदी रतनगडावरून निघते. तिला अमृतवाहिनीं असें म्हणतात. राहूनें गिळलेलें अमृत केतूच्या मुखांतून या गडावर बाहेर पडलें व तें प्रवाहरुपानें वाहूं लागलें, त्यास प्रवरा ( अति श्रेष्ठ ) किंवा अमृतवाहिनी हें नांव मिळालें. रत्नगड–रतनगड–क्षीरसमुद्र मंथनांतून निघालेल्या १४ रत्नांपैकीं हें अमृतरत्न ज्या गडावर केतुमुखांतून पडलें तो रत्नगड किंवा रतनगड.

विषप्राशन केलेल्या म्हातार देवाचें ( शंकराचें ) मंदिर मौजे घाट शिरस, महाल पाथर्डी, जि. नगर येथें हल्लीं आहे, व १४ रत्नें वांटण्याच्या वेळीं हे म्हातारदेव देवाच्या पंक्तींत शेवटीं बसले होते. व त्यांनीं विषरत्न आपल्यास घेतलें अशी घाटशिरस येथें व तिकडील भागांत आख्याइका आहे असें शिरडीचें तलाठी श्री. प्रल्हाद सदाशिव गुंफेकर राहणार नेवासें, हे सांगतात.

श्रीविष्णूंनीं मोहिनीं स्वरूप धारण केलें, तें अद्यापही त्याच नांवानें म्हणजे मोहिनीराज या नांवानें शिरडीहून २५–३० मैल दूर असलेल्या नेवासें ( निधिनिवास ) क्षेत्रीं विराजमान झाले आहेत. समुद्र मंथनांतून निघालेल्या १४ रत्नांपैकं लक्ष्मी, कोस्तुभ, शंख व धनुष्य हीं चार रत्नें विष्णूंनीं ( मोहिनीराजांनीं किंवा अर्धनारीनटेश्वरांनीं ) आपल्याकरतां ठेविलीं. हल्लीं नेवाशास मोहिनीराजांचे अर्धांगीं लक्ष्मी आहे. हें सुप्रसिद्ध आहे. मोहिनीराजांना त्यावरूनच अर्धनारीनटेश्वर म्हणतात. त्यांचा अर्धा भाग पुरुषाचा व अर्धा भाग स्त्रीचा आहे. अर्ध्या भागास पुरुष वेष व अर्ध्या भागास स्त्री वेष घातलेला असतो. याच मोहिनीराजांना, भगवान् श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं श्रीज्ञानेश्वरींत १८ व्या अध्यायांत १८०४ या ओवींत श्रीमहालया व ( राजवाडे प्रतींत १७८२ व्या ओवींत ) महालसा असें म्हटलें आहे. मीं नेवासें स्वतः पाहिलें आहे.

ऐरावत्, कामधेनु, रंभादि देवांगना, पारिजातक, धन्वंतरी, हीं पांच रत्नें देवांचा राजा इंद्र यांनीं आपल्याकरतां ठेविलीं, त्या इंद्राचें स्थान बेलापूर ( इंद्र स्थापित बिल्वेश्वर अपभ्रंश बेलापूर ) येथें आहे. ( श्री. हरि गणेश पारखे, बी. ए. एल्एल्. बी., नगर जिल्हा स्कूल बोर्ड चेअरमन यांचा १९३१ सालीं लिहिलेला " आमचा नगर जिल्हा. " )

कालकूट विष व चंद्र हीं दोन रत्नें शंकरांनीं आपल्याकरितां ठेविलीं. त्या शंकराचें स्थान घाटशिरस हें आहे.

देवांचे वैद्यराज अश्विनीकुमार किंवा धन्वंतरी हें रत्न इंद्रानीं घेतलें. पण तें अश्विनीकुमार ज्या ठिकाणीं राहिले होते तें ठिकाण अश्वी या नांवानें प्रसिद्ध आहे. तसेंच धन्वंतरीचें घराणें कायगांव टोक्यास प्रसिद्ध आहे.

चंद्र हें रत्न जरी शंकरांनीं घेतलें, तरी जेव्हां तें सागराच्या उदरांतून बाहेर आलें तेव्हां ज्या स्थानीं पृथ्वीतलावर राहिलें, तें स्थान अद्याप पावेतों चांदगांव या नांवानें प्रसिद्ध आहे व तेथें चंद्रेश्वर महादेवाचें मंदिर आहे ( " आमचा नगर जिल्हा " या पुस्तकांत आहे. )

ज्या सूर्यनारायणानें आपल्यासाठीं सात तोंडांचा घोडा हें रत्न ठेवलें, त्या सूर्य नारायणाचें यमस्थान किंवा विवस्थान म्हणजे कोल्हार हें आहे. [" आमचा नगर जिल्हा " पारखे कृत यांत आहे.]

ज्या दैत्यराज जरासंधानें मथुरेवर १८ हल्ले केले, त्या जरासंधाची नगरी जोर्वे येथें होती याबद्दलची दंतकथा मला जोर्वे, ता. संगमनेर येथील रहिवासी श्री. एकनाथ

गोपाळ शेट सोनार, वय अजमासें ६५।६६ यांनीं ता. २३-१०-३७ रोजीं शिरडी येथें अशी सांगितली कीं त्यांच्या गांवीं आबा देऊ महार याच्या घरास ११ हात लांबीची व २४ इंच घेराची एक हाडाची तुळई (बहाल Beam) होती. ती (एकनाथशेटनीं) त्यांनीं स्वतः ४० वर्षांपूर्वी आपल्या डोळ्यांनीं पाहिली होती. त्या महाराचा निर्वंश झाला म्हणून ती तुळई गांवकरी लोकांनीं त्यांचे गांवीं असलेल्या प्रवरा नदींत टाकून दिली. ही नगरी जरासंधानें पालथी केली, म्हणून येथें जीं मडकीं गाडगीं जमिनींत सांपडतात तीं पालथीं सांपडतात.

शिरडीच्या पश्चिम दिशेनें सुमारें ३५ मैलांवर निफाड तालुक्यांत नांदुर मदमेश्वर नांवाचें गांव आहे. तेथें सन १९०८-९ सालीं श्री गोदावरीमाईस जलप्लवन खात्याकडून (Irrigation Department) एक फार मोठा पाट खणण्यांत आला, व तेथें फार मोठ्या उंचीचें एक धरण बांधण्यांत आलें. त्यावेळीं तेथें २०-२५ फूट खोलीवर एक ७० फुट लांबीचा सांगाडा आढळून आला. तो १० फूट लांबीच्या सात बैलांच्या गाड्यावर घालून निफाडचे मामलतदारसाहेब यांच्यामार्फत मुंबईस पाठविण्यांत येऊन नंतर तो विलायतेस गेला. तो माणसाचा होता असें शिरडी जवळील निमगांवचे पाटील केशव बाळा व सोनेवाडीचे जलप्लवन खात्यांतील तारमास्तर श्री. गंगाधर विष्णु क्षिरसागर व इतर पुष्कळ मंडळी स्वतः डोळ्यानें पाहिल्याचें सांगतात. मी निफाड मामलतदारसाहेब श्री. काणे [ हल्लीं नंदुरबार ] व श्री. नांदे, बी. ए. एलएल. बी. सरपंच निफाड ग्रामपंचायत यांना श्री. जे. डी. गडकरी, एलएल. बी., वकील निफाड यांच्या सांगण्यावरून या सांगाड्याची माहिती ता. १६-१०-३७ रोजीं विचारली होती. पण त्यासंबंधीं माहिती कोणीच मला दिली नाहीं. तथापि तो सांगाडा प्रत्यक्ष पाहिल्याबद्दल माहिती सांगणारे इसम या भागांत पुष्कळ आहेत.

राहुरी, रतनगड, नेवासें, बेलापूर, घाटशिरस, अश्वी, चांदगांव, कोल्हार जोर्वें व नांदूर मदमेश्वर हीं सर्व गांवें नगर जिल्ह्यांत आहेत हें दिसून येईल. यावरून पौराणिक दृष्ट्या समुद्र या भागांत होता. त्याचें मंथनाही इकडेच झालें, व त्यांतून निघालेल्या रत्नांची वाटणीही इकडेच झाली, असें स्पष्ट दिसतें.

जोर्वें व नांदुर मदमेश्वराच्या माहितीवरून भूगर्भशास्त्र दृष्ट्या, गोड्या पाण्याचा समुद्र येथें होता ( क्षीरसागर ) असें दिसतें. हीं गांवें नगर जिल्ह्यांतच आहेत.

वरील अनुमानास श्री. गोदावरी महात्म्य अ. ३५ याचा आधार असून आणखी एक संतकविवचनाचा पुरावा मिळतो. तो खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. समुद्रमंथन महाराष्ट्रांत झालें, असें सुमारें १२५ वर्षांपूर्वी श्री. होनाजी बाळ, सगनभाऊ यांचे समकालीन होऊन गेलेले, शिरडीपासून, ७-८ कोस दूर सिन्नर-रस्त्यावर असलेले वावी ग्रामनिवासी, नामदेव शिंपी जातीचे अवतारी व प्रासादिक संतकवि तसासगीर श्री. परशराम ( विठ्ठल गुरूचे शिष्य ) यांनीं केलेल्या लावण्यांपैकीं नंबर १२७ या लावण्यांत खालील मजकूर आहे.

## लावणी १२७

" मोहनी राज । महाराज शामसुंदरा सानळी तनू । नैवसें केलें म्हणून नेवासें सकळ लागलें म्हणूं ॥ धृ० ॥ देवदानवें । मिळून केलें समुद्रमंथन जधीं । शेषाचा दोर लावला । मंदाचलाची रवी । हात पायाची । करून मालडी । नाटक हरि लाघवी । पृथ्वी लागली । डबूं कच्छ रूप । देवें धरलें तधीं ॥ सुरापान अमृत वाहितां । कळूं लागली दुही । सुर पंक्तीमध्यें राहु बैसला । चंद्र दावित खुणूं । तानवशनें शीर छेदिलें निवडून जैसे कणू ॥ मोहनीराज ॥ १ ॥

मूळ द्वारांतूनि मुळा निघाली । कंठांतुनि प्रवरा । रतन गडापशि । रत्नें वाटुन । दिघली सुराऽसुरां । राहु मारिला म्हणुन राहुरी । वास्तिमुळेच्या तिरां । टोंक्यापाशीं । संगम झाला । स्थापुनि सिद्धेश्वरा ( नेवाशाचे मोहिनीराज=हरी वटोक्याचे सिद्धेश्वर=हर) हरी हरांची दोन्हीं स्थानें । जुनाट परंपरा । अमृतायी धार बारीक । वाहे प्रवरा निरां । पुण्य प्राणी असेल कोणीं । योगी त्या घडेल प्राशन ॥ मोहिनीराज ॥ २ ॥

या कवीच्या सर्व लावण्या ४ कडव्यांच्या किंवा ४ पेक्षां जास्त कडव्यांच्या आहेत. फक्त हीच लावणी २ कडव्यांची मिळाली. हिचीं आणखी २ कडवीं कोठें तरी असावींत व त्यांत याच संबंधाची जास्त माहिती असली पाहिजे. पण ती दोन कडवीं उपलब्ध नाहींत असें या लावण्याचें पुस्तक छापणाऱ्या गृहस्थानें पुस्तकाच्या प्रस्तावनेंत लिहिलें आहे. प्रस्तावनेंत या कवींच्या संतत्वाबद्दल व त्यांच्यावर झालेल्या ईशकृपेबद्दल चांगली माहिती दिली आहे.


## पौराणिक कालांतील महाराष्ट्राची मर्यादा

पैठण हें पूर्वी महाराष्ट्राचें केंद्र बनलें, व गोदावरी महाराष्ट्राची मध्यवर्ति रेषा बनली. त्र्यंबकेश्वरापासून मोंगलाईंत असणाऱ्या नांदेड गांवापलीकडे असणाऱ्या बासर गांवापर्यंत गोदावरी महाराष्ट्रांत आहे, व बासरगांवीं जी सरस्वतिदेवी आहे तिच्या पाश्चिमेस महाराष्ट्र व पूर्वेस तैलंगण असा पौराणिक उल्लेख आहे. या गोदावरीच्या उत्तर तटास शेषाद्री पर्वतापर्यंत व दक्षिण तटास भीमानदीपर्यंत महाराष्ट्राची हद्द मानण्यांत येते. पूर्वेला प्राणिता अथवा मेन ( वेनगंगा व पाश्चिमेस सह्याद्री अशी मर्यादा पौराणिक ग्रंथावरून दिसते. ( पारखेकृत आमचा नगर जिल्हा पान ७० )

कोकणमठ ( शिरडीपासून ८ मैलांवर गोदावरीच्या कांठीं, ) मातुळठाण, नागठाण, भामठाण व बादठाण हीं पांच ठाणीं गोदावरीच्या काठीं विद्यापीठें बनलीं होतीं. त्या स्थानाला पुराणांत मातृकस्थानें (Alma-matar-an epithet applied by student to the university where they have been trained') असें नांव आहे. जसजसा दंडकारण्याचा ( रामक्षेत्राचा उत्कर्ष होत चालला, तसतसें त्याचें महाराष्ट्र बनलें, व एक मध्यवर्ति विद्यापिठाची आवश्यकता भासूं लागली, व पैठण उर्फ प्रतिष्ठान हें मध्यवर्ति विद्यापीठ निर्माण झालें.

मातुलठाण म्हणजे ( पुणतांबें असावें. नागठाण, भामठाण, व बादठाण हीं स्थानें मोंगलाईत आहेत. पारखेकृत " आमचा नगर जिल्हा "

महाराष्ट्रांत गोड्या पाण्याचा समुद्र होता म्हणजे श्रीनर्मदामाईपासून श्रीकृष्णामाई-पर्यंतच्या मधील भागांत दर्या होता म्हणजे क्षीरसमुद्र होता असें दिसतें.




वरील माहितीवरून शिरडी हें गांव राम अवतारीं किंवा कृष्ण अवतारीं कोणत्या नांवानें प्रसिद्ध होतें याचा पत्ता लागत नाहीं. फक्त समुद्रमंथन शिरडीजवळ झालें

२४ रत्नांची वांटणीही शिरडी जवळच झाली, विद्यापीठें ही शिरडीच्या नजीक गांवांत होतीं व नारदांची नारदीही शिरडीजवळच झाली व शिरडी हें गांव दक्षिण द्वारकेचें केंद्र जें पंढरपूर त्याच्या चतुःसिमेंत येतें; म्हणजे शिरडी पंढरपूरचाच भाग होता इतकें सिद्ध होतें. नेवासें येथील एका बडव्याच्या घरीं महालयामहात्म्य म्हणून एक संस्कृतांत लिहिलेला फार मोठा ग्रंथ आहे, व महालया हें नेवाशाचें प्रसिद्ध दैवत जें मोहिनीराज त्याचें नांव आहे. या ग्रंथांत समुद्रमंथनाचें व त्या भागांतीळ पुष्कळ गोष्टींचें वर्णन आहे असें समजतें. परंतु तो ग्रंथ बराच प्रयत्न केला, पण उपलब्ध नाहीं. उपलब्ध झाल्यास शिरडी ग्रामासंबंधीं बराच प्रकाश पडेल असें वाटतें. प्रयत्न सुरू आहे बाबांची. इच्छा !

येथपर्यंत संतवचन, पुराण, आख्यायिका व निसर्ग यांच्या पुराव्यावरून बाबा हल्लींच्या शिरडींतील व मशिदीस द्वारका, द्वारकाबाई द्वारावती या नांवानें कां संबोधीत व तिच्या प्रभावाची महति कां गात, या भागांत पूर्वीं गोड पाण्याचा समुद्र होता, या भागांत फार फार प्राचीन काळापासून यादवांचें राज्य होतें, दिंडिरवनाची व्याप्ति पंढरपूर केंद्र धरून, परळी [ सज्जनगड ], आळंदी, शिरडी, नेवासें, पैठण व विजय-नगर या वर्तुल भागांत होती. रुष्ट झालेल्या श्रीरुक्मिणीमातुःश्रींना भेट देऊन त्यांची समजूत करण्याकरतां व भक्तसिंह श्रीपुंडलिक यांनीं दर्शन देऊन त्यांना वर देण्याकरितां कृष्णपरमात्मा फार फार वर्षांपूर्वी एका काळीं दिंडीरवनांत आले. द्वारकेचीं सर्व संपत्ति सर्व वैभव, सर्व ऐश्वर्य इकडे आणून भक्तचूडामणि पुंडलिक यांचे वरमागणीस मान देऊन दक्षिणेस दक्षिणद्वारकेची स्थापना दिंडीरवनांत करून श्रीपुंडलीक यांनीं बसण्याकरतां दिलेल्या विटेवर आज अठ्ठावीस युगें विठ्ठल या नांवानें पंढरपूर येथें श्रीरुक्मिणी मातुः-श्रींच्या सान्निध्यांत उभे आहेत असें सिद्ध होतें.

येथें " उभे " व " विटेवर " या शब्दांचें अर्थ संकुचित न घेतां विस्तृत घेतलें पाहिजेत. तशीच हल्लींची विठ्ठलमूर्ति दगडाची आहे व वीटही दगडाचीच आहे. मूर्ति दगडाची असल्यामुळें तिली वीट सोडून कोठेंही हालचाल करतां येत नाहीं. किंवा खालीं बसतांही येत नाहीं. पण श्रीकृष्ण परमात्मा ह्यांना वाटेल तिकडे हालचाल करतां येत होती, व बसतां–उठतांही येत होतं. दगडाची मूर्ति व दगडाचीच विट असल्यामुळें विठ्ठलमूर्ति त्या विटेवर अठ्ठावीस युगें उभी आहे हें ठीक आहे. पण निरनिराळे अवतार किंवा भिन्न भिन्न रूपे घेणारी कृष्णमूर्ति एके जागीं अशी कशी व किती काल उभी राहील ? पण तशी जरी उभीं राहिली नाहीं, तरी भक्तानें भक्तीनें व प्रेमानें दिलेल्या वस्तूचा उपयोग, तिला यत्किंचित केव्हां व कोठेंही न विसंबतां, आपल्या सोईप्रमाणें कोणत्याही आवतारात स्वरूपांत भक्तखूण म्हणून निरंतर करीत राहिलें म्हणजे झालें; तशीच बाबा उशाशीं घेऊन निजत असलेल्या विटेची हकीकत आहे. असो. या विटेची हकीकत पुढें विस्तृतपणें येणार आहे, म्हणून येथें देत नाहीं.

कृष्ण परमात्मा मानव स्वरुपांत असल्यामुळें ते पंढरपूर केंद्रस्थानांतून वर्तुळांतील इतर सहा पाकळ्यांपैकीं कोठेंही राहूं शकत होते. द्वारकेचा परीघ जर ८०० मैलांचा होता,

तर तिचा व्यास २००-२५० मैलांचा असलाच पाहिजे. पंढरपुराहून वरील साही स्थानें निःसंशय दोन अडिचशें मैलांच्या आंतच आहेत. करितां शिरडी हें ठिकाण परमात्म्याचें एवढ्या मोठ्या घेराच्या या दक्षिण द्वारकेंतील अत्यंत शांततेचें एकांताचें व फार आवडतें स्थान असूं शकेल, व श्रीकृष्णाही पुंडलिकानें दिलेली वीट नेहमीं अत्यंत काळजीपूर्वक आपल्याजवळ, श्रीलक्ष्मी मातुःश्रीप्रमाणें किंवा कौस्तुभ मण्याप्रमाणें ठेवीत असतील.

आतां कृष्ण परमात्म्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळीं रूपें धारण केलीं आहेत हें सुविख्यातच आहे. गोकुळांत असतांना हे एका काळीं ब्रह्मदेव झाले होते. पंढरपुरास विष्णुरुपानें विठ्ठलरूप बनून मस्तकावर शंकर धारण केलें व विष्णु स्वतः आहेतच. विष्णुर्नारायणः कृष्णो वैकुंठो विष्टरश्रवः (अमर कोश) म्हणजे हे दत्ताचा पूर्ण अवतार आहेत असें निःशंक सिद्ध होतें.

आतां आपण शिरडींतील बाबांच्या चरित्राकडे व लीलांकडे वळूं, व द्वारकेंतील कृष्ण परमात्म्यांच्या चरित्रांत व लीलेंत व बाबांच्या शिरडींतील चरित्रांत व सूक्ष्म दृष्ट्या किती तरी विलक्षण साम्य आहे तें पाहूं.

ता. २१ एप्रिल १९३६ रोजीं शिरडीचे रामगीर गोसावी (ज्यांना बाबा बापुगीर म्हणत) त्यांनीं मला श्रीद्वारकामाईंत (शिरडींतील मशिदींत) बाबांच्या अनेक लीला सांगतांना प्रस्तुत संशोधनाला लागूं पडणारी अशी एक कथा सांगितली; ती अशी कीं, एका पौष वद्य आमावास्येला आलेल्या सूर्यग्रहणाच्या दिवशीं बडे बाबा मालेगांवचे एक फकीर मशिदींत कांहीं धान्य वांटीत होते. त्यांनीं मला दीड रुपया दिला. बाबांनीं मला विचारलें, "काय दिलें रे तुला बडे बाबांनीं ? दाखव मला." मी दाखविलें. बाबांनीं तो दीड रुपया मजकडून घेतला. पाहिला, व. मला परत दिला, व मला म्हणाले कीं, आपण कीं नाहीं **माहुरला** लहानाचे मोठे झालों. लोक लई तरास देऊं लागले. आपण कंटाळलों. मग मी गेलों **गिरनारला,** तिथं बी लोक लई तरास देऊं लागले. मग मी गेलों **अंबूच्या पहाडावर.** तिथं बी लोकांनीं लई सतावलं; मग तिथून मी गेलों **अक्कलकोटला.** तिथं बी लोकांनीं आपल्याला लई तरास दिला. मग तिथून मी गेलों **दौलताबादला.** तिथं एक आपल्याला जन्या (श्रीसमर्थ जनार्दन स्वामी) भेटला, त्यानं माझी लई सेवा केली. मग मी गेलों **पंढरपुरला.** तिथं बी कंटाळा आला. मग मी आलों **शिरडीस** आन् मी इथंच राहिलों.

वरील कथेवरून बाबांनीं पहिल्या सहा स्थानीं दत्तस्वरुपांत वास्तव्य करून शेवटच्या दोन ठिकाणीं कृष्ण स्वरूपांत राहून व श्रीमद्भगवद्गीतेंत व पुराणांतरी लिहिल्याप्रमाणें शिरडीस अनेक कृष्णलीला प्रगट केल्या, व अगणित कृष्णलीला ध्वन्यार्थानें करून दाखविल्या, हें त्यांच्या पुढील उद्गारांवरून व चरित्रावरून दिसून येईल.

पुढील पानावर वरील आठ पुण्यक्षेत्रांचा संक्षिप्त नकाशा दिला आहे; त्यांतील स्थलांचा अनुक्रम प्रथम गिरनार, नंतर अब्रू व नंतर माहूर असा घेतला म्हणजे कृष्ण-

प्रभु पूर्वी श्रीरुक्मिणीमाईंची समजूत करण्याकरितां, भक्तश्रेष्ठ पुंडलिक यांना दर्शन देण्याकरितां, व दिंडिरवानांत दक्षिण द्वारकेची स्थापना करण्याकरितां पश्चिम द्वारकेंतून ज्या मार्गानें दक्षिणेंत आले, त्या मार्गाचें ध्वन्यर्थानें बाबांनीं दिग्दर्शक केलें आहे असें दिसलें. बापुगीर ८० वर्षांवर वयाचे आहेत. त्यामुळें त्याचे सांगण्यांत स्थलें मागें-पुढें होण्याचा संभव आहे.

[ अपूर्ण ]

श्रीसाईपदरज दासानुदास
कै. बा. वि. देव
बाबांचें बाळ

---

# काला कीर्तन

## ( १ )

गोकुळांत कृष्ण आला । आनंद गोपींना झाला ॥१॥
यशोनंदाच्या पोटीं आला । कालिया यमुनीं म्याला ॥ २ ॥
गोकुळांतला हा साव । कुठें आहे पुसे केशव ? ॥ ३ ॥

## ( २ )

गोकुळ असे जीवन । समुदाय इंद्रिय जाण ॥ १ ॥
आनंद नंद हा पीता । सद्वृत्ती यशोदा माता ॥ २ ॥
जीवात्मा बाळा रे कृष्ण । अहंकार कालिया कृष्ण ॥ ३ ॥
प्रवृत्ति मनाच्या गोपी । कधीं शांत कधीं रे कोपी ॥ ४ ॥
हृद्सागर यमुना डोह । जीवाला पडती मोह ॥ ५ ॥
बाळकृष्ण साई येई । केशवा जाऊनी देई ॥ ६ ॥

## ( ३ )

वसु-देवकीचा बाळ । नंदा घरीं आला ।
कंस मारण्या कीं जाण । गोकुळीं वाढीला ।
गोपी इंद्रियाचा स्वामी । गोकुळीं पाहिला ।
कृष्णसखा साई माझा । शिरडीं देखिला ।
अर्जुनाचे घोडे हांकी । धरी तो लगाम ।
दश इंद्रियांची दोरी । धरी साई शाम ।
सारथ्य पंडुचे पूर्ण । मारुनी कौरवा ।

दंभासुरा चिरडूनी । तारिती या जीवा ।
मुरलीचा गोड नाद । जाई ब्रह्मांडांत ।
अंतरीची वेणू बोले । जीवींचें संगीत ।
अनुहत ध्वनि नाद । घुमे हृदयांत
वासनेच्या गोंगाटीं । नाहीं ऐकूं येत ।
हृदयाच्या लावा तारा । धरा एक सूर ।
आनंदाच्या घरीं दंग । केशव हो चूर ॥

( ४ )

हांस रे ! हांस रे !! हांस रे !!! लडीवाळा । बाळा ! ॥धृ॥
शिणलें बाई बोल बोलुनीं ।
हांसत कां रे नाहीं अजुनीं ।
कां रुसावा, धरी अबोला ।
घेरे घुंगुर वाळा । बाळा ! हांसरे लडिवाळा !
गोप गवळणी येती अंगणीं ।
गवळणी संगे दूध पाणी
हीच विनंती चक्रपाणी ।
बोल बोबडी वाणी । बाळा । हांसरे लडिवाळा ।
खुदूकन हांसला अरे लबाडा ।
नंदानंद हृण दृष्ट काढा ।
सद्‌वृत्ती यशोदा वांटा ।
गोड गोकुळीं वाटा । बाळा ! हांसरे लडिवाळा ।
सत्‌वृत्ती यश नंदानंदा तो ।
खेळीं हांसत कृष्णात्मा तो ।
मनप्रवृत्ती धरीं हातां तो ।
गोपी संगे खेळीं गोकुळा । हांस रे लडिवाळा ।
कौंस घेई तो बळी आठवा ।
माया मेली कृष्ण आठवा ।
केशव सांगे घ्या केशवा ।
यशोनंदाच्या बाळा ! तान्ह्या । हांसरे लडिवाळा ।

# —: श्री साई भजन माला :—

## " प्रासादिक अभंग "

### ( १ )

साईनाथ हरी गुरु विठोबा साईनाथ हरी गुरु ।
कधिंरे कधिंरे कधिंरे देवा भेटविसी सद्गुरु ।
प्रपंच भोंवरा कसा । विठोबा प्रपंच भोंवरा कसा ।
सागरीं भयंकर बोटी बुडवी देई समाधी तसा ।
कोणी न म्हणती बसा विठोबा कोणी न म्हणती बसा ।
पोरां टोरांचें लेंडार मागें सज्जनीं पसरे पसा ।
बुडालों भवसागरूं विठोबा बुडालों भवसागरूं ।
कधिंरे कधिंरे कधिंरे देवा भेटविसी सद्गुरु ॥ १ ॥
मायामगर बुडवी विठोबा मायामगर बुडवी ।
तुज वांचुनि कोण मलारे येऊनी झणी सोडवी ॥
राहू काळ तो भुलवी विठोबा राहु काळ तो भुलवी ।
अविचाराकडे खेंचुनी नेई पहा कसा तो ठकवी ॥
कुठें जाऊनी विचरूं विठोबा कुठें जाऊनी विचरूं ।
कधिंरे कधिंरे कधिंरे देवा भेटविसी सद्गुरु ॥ २ ॥
केशव आत्मा खरा विठोबा केशव आत्मा खरा ।
पतित पातकीं असे बरा मी बरोबरी दिसतो खरा ॥
सत्य शुद्ध आचरा विठोबा सत्यशुद्ध आचरा ।
मग सद्गुरु जवळीं उभा असे निश्चीत हृदयीं धरा ॥
बुडलों भवसागरूं विठोबा बुडलों भवसागरूं ।
कधिंरे कधिंरे कधिंरे देवा भेटविसी सद्गुरु ॥ ३ ॥

### पद २

सुंदर तें ध्यान । बसे मशिदींत ॥ कठ्यावरी हात ठेवोनियां ॥ १ ॥
डोई शुभ्र फडका । धरी हातीं सटका ॥ चिलीम आणिकां । सदोदीत ॥ २ ॥
तमाखु ओढूनी । देई ज्ञानामृत ॥ भक्तिभाव प्रेम । सकळींका ॥ ३ ॥
पवीत्र शिरडी । केशवा रोकडी ॥ देईल बापुडी । प्रेमरस ॥ ४ ॥

( ३ )

कांकुळनी आलों साई । धरीले चरण ॥
अर्पुनियां आपणांसी । आलों कीं शरण ॥ १ ॥
संसार असार परी । एक तूंची सार ॥
नाहीं जगीं थारा मज । तुझाची आधार ॥ २ ॥
दिलें पूर्ण सर्वां प्रेम । कळों नेदी वर्म ॥
चोख सत्कर्म नेम । हाचि खरा धर्म ॥ ३ ॥
तुझ्या विना काय बापा । आहे या जगांत ॥
प्रेम रंगे नटलासी । हृदयीं तूं निवांत ॥ ४ ॥
जाग देई केशवासी । आहे "मी" जवळी ॥
प्रेमाचा भुकेला तारे । दों हातीं कवळी ॥ ५ ॥

( ४ )

नाहीं केली तुझी सेवा । निपजलों जंत ।
सांगूं कसें तुला देवा । भोगीतसे दुःख ॥ १ ॥
नाहीं तोंड मागण्यासी । तुझ्या पाशीं सुख ।
भोगण्यां ते साईदेवा । धीर दे त्वरीत ॥ २ ॥
वेडे वाकुंडे रे देवा । घेईन तें नाम ।
कळों आलें मज आतां । आहे त्यांत प्रेम ॥ ३ ॥
जिवाचा तूं जीवलग । सखा साईरंग ।
करुं नका बाबा आतां । केशवाचा भंग ॥ ४ ॥

( ५ )

पाप पुण्य कर्म । नर जन्म प्राणी ।
शुध्द मूळ वस्तू । सिध्द आहे वाणी ॥ १ ॥
प्रकाशांधार । भास मात्र जाण ।
स्वयंभू प्रकाश । सूर्यनारायण ॥ २ ॥
शुद्ध भाव कर्म । पूर्ण प्रेमार्पण ।
विनवी केशव । सांई नारायण ॥ ३ ॥

( ६ )

आमुचें जीवन तेंची । साईचे स्मरण ।
विस्मरण बाबा साई । दुजे ना मरण ॥ १ ॥

झोंप घेसी आळस कीं । पूर्ण रजतम ।
विस्मृती देहाची ती । स्मृती आत्माराम ॥ २ ॥
सावधान सावधान । सांगतो केशव ।
काळ उभा पाठीं पुढें । लक्ष एक देवा ॥ ३ ॥

(७)

प्रसंगानुसार स्फुरतें तें ज्ञान ।
अनुभवें सिद्ध होई जें पावन ॥ १ ॥
पुस्तकें पुराणें ग्रंथ कीं पढून ।
झालों शास्त्रीं जगीं पंडीत विद्वान ॥ २ ॥
परी न मिळाला प्रकाश अंतरीं ।
कोरडा राहिलों जन्म जन्मांतरीं ॥ ३ ॥
निखळ तें ज्ञान आत्म स्वप्रकाश ।
अनुभवासंगें मिळे सावकाश ॥ ४ ॥
शरण संपूर्ण केशवानुभव ।
त्रिबक सद्गुरु सत्य साई देव ॥ ५ ॥

(८)

सांबण लावुनी आंग धुतीयेलें ।
मळ मूत्र विष्ठा बाहेरी घातीलें ॥ १ ॥
झालें तेणें बहु शरीर निर्मळ ।
परी नाहीं धालों अंतरीचा मळ ॥ २ ॥
काम क्रोध लोभ मोह मद फार ।
देहींचा मत्सर वहाती गटार ॥ ३ ॥
आधीं साफ करीं संत समागमें ।
तोचि भाग्यवंत राहीं निष्ठा नेमें ॥ ४ ॥
स्नान संध्या तीर्थें व्यर्थ खटाटोप ।
भक्ति भाव भीमा वाहे आपोआप ॥ २ ॥
अंतरीचा झरा आहे तुझ्या पाशीं ।
आटापीट तूंरे व्यर्थ कां करीशी ॥ ६ ॥
ध्यान मन चित्त ठेवीं साई पायीं ।
केशव विनवी पहा नवलाई ॥ ७ ॥

(९)

काय करुं देवा न मिळे विसांवा ।
कोठें गिंवसांवा तुज सांग ॥ १ ॥
तीर्थें व्रतें नेमीं देऊळीं जाऊनीं ।
धुंडूनी राहिलों तुज बापा ॥ २ ॥
साधु संत संग मनासी व्यासंग ।
धरी साईरंग चित्तीं ऐसा ॥ ४ ॥
उमज पडेना केशवाच्या मना ।
कृपा साईनाथा आतां करी ॥ ५ ॥

(१०)

देह विश्व माझें घर । मी आनंदू विश्वंभर ॥ १ ॥
अन्न हेंचि जग मात्र । भक्षक भक्ष्य नान्यत्र ॥ २ ॥
देह कर्म कारण देह । कसा होऊं रे विदेह ॥ ३ ॥
डंका मायेचा पीटती । मनोराज्य कल्पना ती ॥ ४ ॥
सद्गुरुवांचुनी नाहीं फोड । केशवासी साई जोड ॥ ५ ॥

(११)

सत्य आचरोनी राम लीन झाले ।
स्वरुपी स्वयंभू जाऊनी मिळाले ॥ १ ॥
देह हे देऊळ भाव हा हृदयीं ।
पुरुष प्रकृती राम सीता माई ॥ २ ॥
मुखीं सदा राम जाणीं आत्माराम ।
समाधी शिरडीं घेई पूर्णाराम ॥ ३ ॥
समाधी ही माती नका मानूं चित्तीं ।
चैतन्यानंद सांई श्रीराम, मारुती ॥ ४ ॥
केशव वासरुं गुराखी तूं कान्हा ।
घाली कृपाचारा पाजी प्रेम पान्हा ॥ २ ॥

(१२)

लोटूं नको दूरी देवा । करीतो चाकरी ।
पतीत अभागी मी रे । पावन तूं करीं ॥ १ ॥

तुझ्याच सत्तेनें चाले। कृपेनें तुझ्या बा।
होय माती वरखाली। करीती अबाबा॥ २॥
विस्तार वृक्षाचा सारा। एका बीजा पोटीं।
कां रे धुंडविसी आम्हां। करतोसी कष्टी॥ ३॥
परब्रह्म साई तूंची। ॐकार स्वरुपा।
आवर ही "हरीमाया"। तूंची माय बापा॥ ४॥
केशवाला धरी घट्ट। नको सोडूं दूर।
साई विठ्ठल गणेशावा। करीं बेडा पार॥ ५॥

## १३ भैरवी

कोण खबर घेई। विठाई।
तुज विण देवा साई माई॥ धृ०॥
जगतीं दुसरा नाहीं आसरा।
मित्र सोयरें बहू पसारा॥
धांव झणी ग्रेई। आ ऽऽ ई ग॥ १॥
पडलों बुडलों रुतलों पंकीं।
धीर तुझा रे एकची साई॥ २॥
केशवासी तारी। साईग॥ २॥

## (१४)

सुखें निद्रा करी देवा साई–आदिनाथा। देवा साई आदिनाथा।
हृदय बिछाना घालुनी आतां ठेवी पदीं माथा॥ १॥
भक्तांचीं संकटें निवारुंनि थकलेलें दिसतां। बाबा थकलेले दिसतां।
शयन मंदिरी जाऊनी बाबा पहुडावे कांता॥ २॥
रात्र थोडी विश्रांतिची गरज बहू तुम्हां। बाबा गरज बहू तुम्हां।
कांकड आरती झाल्यानंतर दर्शन द्या आम्हां॥ ३॥
मर्दन करितों देवा आपुलें शीण बहू झाला। देवा शीण बहू झाला।
पंचप्राण शाल्ह बरवा घाली देहाला॥ ४॥
चिलीम पाणी सटका बाबा ठेवी उशागत। नाथा ठेवी उशागत।
हांक मारुनी उठवा देवा निजलों दारांत॥ ५॥
वेळ झाली निद्रेची मग उशीर कां आतां। सांई उशीर कां आतां।
केशव विनवी दारीं असे मी जागृती द्या कांता॥ ६॥

# —: शिरडी वृत्त :—

## माहे मे, जून, जुलै, ऑगस्ट १९४९ इसवी

शिरडीस बाहेरगांवच्या लोकांची येजा पूर्वीप्रमाणेंच होत होती. मध्यें पावसाळ्यामुळें व कोपरगांवच्या नदीस पूर येतो त्यावेळीं शिरडीस जाणाऱ्यांचे फार हाल होतात त्यामुळें भक्तमंडळींची येजा कमी होती तरी पण परिस्थितीवरही मात करून साईसाठीं धांवत येणारे भक्त येतच होतें. या चार महिन्यांत ८१ भक्तांकडून निरनिराळ्या प्रकारच्या वस्तू देणगी दाखल मिळाल्या आहेत. जुलैमध्यें गुरुपौर्णीमा उत्सव संस्थानमध्यें साजरा केला गेला. त्यावेळीं फारच गर्दी झालेली होती.

### धर्मकृत्यें:—

अभिषेक, लघुरुद्र, अर्चन, नैवेद्य, ब्राह्मण सुवासिनी वगैरे धर्मकृत्यें नेहमींप्रमाणें झालीं. चार महिन्यांत ७ भक्तांनीं श्रीसाई-सत्यनारायणाच्या पूजा घातल्या.

### कीर्तनः—

**मेः**—या महिन्यांत संस्थान गवयांचीं दोन कीर्तनें दोन एकादशांस झालीं व श्री परशुराम जयंती व श्रीनृसिंह जयंती निमित्त टाकळींकर बुवा यांचें कीर्तन झालें व ह. भ. प. बापूराव तांबोळकर, पंढरपूर यांचे श्रीमंदिरांत कीर्तन झालें.

**जूनः**—संस्थान गवई यांची या महिन्यांत दोन कीर्तनें झालीं.

**जुलैः**—संस्थान गवई यांची या महिन्यांत चार कीर्तनें झालीं. बाहेरगांवचे कीर्तनकार श्री. ह. भ. प. केशवबुवा, सिकंदराबाद. श्री. ह. भ. प. पोपटबुवा लोहणेकर, श्री. ह. भ. प. भास्करबुवा ( श्री. गाडगे महाराजांचे शिष्य ) यांचींही कीर्तनें झालीं.

**ऑगष्टः**—संस्थान गवई यांचीं या महिन्यांत पांच कीर्तनें झालीं. बाहेरगांवचे कीर्तनकार श्री. ह. भ. प. गोपीचंदबुवा बरीकर श्री. ह. भ. प. भास्करबुवा नाशिकर, श्री. ह. भ. प. शंकरस्वामी बारामतीकर यांनींही श्रीमंदिरांत कीर्तनांची हजेरी दिली.

### नवल विशेषः—

**मेः**—ता. ३-५-४९ रोजीं शिरडी येथें नगर जिल्हा शेतकरी परिषद नामदार ल. मा. पाटील व आमदार नानासाहेब कुंटे यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. जनसमुदाय बराच जमला होता. व संस्थानकडून परिषदेस आलेल्या मंडळींस उतरण्यास जागा, चहा व भोजनाची व्यवस्था उत्तम रीतीनें करण्यांत आली.

शिरडीची हवापाणी उत्तम आहे. कोपरगांवीं कॉलरा असल्यानें एक मद्रासी बाई कोपरगांवीं लागण होऊन शिरडीस मयत झाली. पण शिरडी संस्थानचे मॅनेजर श्री. मो. त्र्यं. खडकतकर यांनीं सावधगिरी राखून सर्व चाळींतील खोल्या फिनेलनें स्वच्छ धुऊन घेण्याची व्यवस्था केली. स्पेशल डॉक्टर बोलावून सर्व संस्थानच्या नोकरवर्गास व तेथें त्यावेळीं असलेल्या भक्तगणांस कॉलऱ्याचें इनॉक्युलेशन टोंचून घेण्याची व्यवस्था केली. व ते हे सर्व काम जातीनें हजर राहून पहात होते. ही अभिनंदीय गोष्ट आहे. त्यानंतर नवीन लागण झाली नाहीं.

म्हैसूर संस्थानांतील सुमारें ५०-६० भक्तांचा एक समुदाय श्रीनारायणराजू यांच्या देखरेखी खालीं आला होता. त्यांचे संस्थानमध्यें निरनिराळे मनोरंजक कार्यक्रम झाले ते पहाण्यासारखे होते.

**जून:**— कु. कुमुदिनी लक्ष्मण खांडेकर, मुंबई यांनीं श्रीपुढें पोवाडे म्हणून हजेरी दिली. शिर्डी येथलि हवापाणी उत्तम आहे.

**जुलै:**— आषाढ शु॥ ११ निमित्त श्रींचे पालखीची मिरवणूक निघाली होती. याच महिन्यांत गुरुपौर्णिमा उत्सव साजरा झाला. शिरडीची हवापाणी उत्तम आहे.

**ऑगस्ट:**— श्रीगोकुळअष्टमीनिमित्त श्रीकृष्णजन्मोत्सवाचें कीर्तन झालें व श्रींच्या रथाची मिरवणूक निघाली होती. श्री. श्री. रा. माड्ये यांनीं श्रीपुढें काव्य-गायनाची हजेरी दिली. शिरडीची हवापाणी उत्तम आहे.

सेक्रेटरी
**"शिरडी संस्थान"**

---

## —: श्रीगुरुपौर्णिमा उत्सव :—

श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज शिरडी. यांचा गुरुपौर्णिमा उत्सव सालाबादप्रमाणें यंदा मिती आषाढ शु॥ १५ शके १८७१ ता. १० जुलै सन १९४९ रोजीं साजरा झाला.

उत्सवास आरंभ आषाढ शु॥ १४ रोज शनिवार ता. ९-७-४९ रोजीं झाला. या दिवशीं नित्य कार्यक्रमापेक्षां दुपारीं २ ते ५ पर्यंत भजन मंडळी वेल्लोर पार्टी याचें संगीत भजन झालें. त्यानंतर कीर्तन झालें व रात्रौ ८ तें १० पर्यंत श्री. जगन्नाथ पंडीत सुरतकर यांचें संगीत गायकी भजन झालें. नंतर १० ते ११ पर्यंत श्रींच्या पालखीची गांवातून मिरवणूक काढण्यांत आली. त्यावेळीं पालखी पुढें निरनिराळे खेळ व नकला करण्यांत आल्या त्यांत संस्थानचे नौकर श्री. मुरलीधर गोंदकर यांनीं अंधळ्या भिकाऱ्याची केलेली नक्कल फारच उत्तम वठली.

मिती आषाढ शु. १५ रोज रविवार ता. १०-७-४९ ला पहांटे काकड आरती नंतर गायन व श्रींचे समाधीवर अभिषेक अर्चन, लघुरुद्र, पूजा वगैरे धर्मकृत्यें

करण्यांत आलीं नंतर श्रींचे समाधीस मंगलस्नान वगैरे होऊन पुष्पार्पण, वस्त्रार्पण करण्यांत आलें. दुपारीं आरती करून तीर्थप्रसाद करण्यांत आला. दुपारीं कीर्तन होऊन संध्याकाळीं श्रींचे रथाची मिरवणूक काढण्यांत आली. रात्रीं पुण्याच्या श्रीसाईदास मंडळाचे निरनिराळे कार्यक्रम झाले. श्री. माधवराव जोशी यांचे गायन भजन श्री. जोगबुवा, मुंबई यांचें गायन श्री. दामुअण्णा बेलापूरकर यांचें सनईवादन श्री. येवलेकर यांचें सनईवादन श्री. वेणुबाई शिरडी यांचें गायन श्री. दत्तोबा व श्री रंगनाथ शिंपी यांचें तबलावादन श्री. चिंतामण चिवटे यांचें ऑर्गन वादन श्री. रामचंद्र कोंडाजी यांचें व श्री. बडवे पुणें यांचें मुरलीवादन अशा प्रकारचें निरनिराळे कार्यक्रम करून या भक्तांनीं श्रींची रात्रभर सेवा केली.

आषाढ व|| १ रोज सोमवार ता. ११–७–४९ ला सकाळीं १० ते १२|| पर्यंत काला कीर्तन होऊन उत्सव समाप्त झाला. उत्सवाप्रित्यर्थ संस्थान नोकरवर्गास प्रत्येकीं ५ रु. प्रमाणें बक्षीस देणेंत आले. या सालीं गुरुपौर्णिमेच्या उत्सवास बाहेरगांवचे लोक नेहमींपेक्षां जास्त आले होते व त्यांची सोय संस्थाननें उत्तम प्रकारें ठेवलेली होती.

अशाप्रकारें श्रींचा उत्सव उत्तम प्रकारें साजरा करण्यांत आला.

सेक्रेटरी

**“ शिरडी संस्थान ”**

## पोवाडा

राही राही हृदया मम राही साईबाबा ।
भोळी भावडी भक्ती माझी स्वीकारून घेई ॥
नेई नेई उद्धरून नेई ॥
रंजलो गांजलो नडुनी पडलों कर माझी सोयी ।
पाहीं पाहीं देवा भक्तांची ही पाही ।
ऐक्य समता शांति गुणाला सौभाग्य देई ॥
देई देई आशिर्वाद भक्तांना देई ।
वधुवरांची ध्येयनिष्ठयें हारतुरे घेई ।
घेई घेई पदकमली बा जागा तूं देई ॥

वरील पोवाडा हा शंकर रावजी, राहणार राहाता, यानें केला, व तो एक तारीवर नेहमीं आपल्या सुस्वर कंठानें स्वतः म्हणून ‘ साई ’ला आळवीत असतो. विशेष म्हणजे तो अशिक्षित **चोखा मेळा** आहे. ह्यावरून भक्ती किती श्रेष्ठ आहे हें समजतें.

**संपादक**

# ‘ बाबाची शिकवण ’

मनाच्या ठिकाणीं एक विलक्षण गुण आहे. तो हा कीं, ज्या ठिकाणीं त्याची प्रीति असते तेथेंच ते स्थिर होते आणि जेथें त्याला अप्रिती वाटते तेथें तें जाऊं इच्छीत नाहीं, हा गुण मनाच्या ठिकाणीं स्वाभावतःच आहे. मनाला स्वाधीन करण्यासाठीं अभ्यास व वैराग्य हे दोन संकेत सांगितले आहेत, तसेंच मनाला चांगली संगत दिल्यास बरें होईल. पहिली संगत अन्नाची. अन्न हें ब्रह्म आहे. तें सात्विक व शुद्ध करूनच घेतलें पाहिजे, म्हणजे मनाला एक प्रकारचा आनंद प्राप्त होतो. त्याकरितां प्रत्येक मुमुक्षूनी अन्न शुद्ध करून सेवन करणें.

श्रीसद्गुरु साईबाबांनी हीच शिकवण सर्वांना दिली आहे. एके दिवशीं सगुण मेरू नाईक हे सकाळीं बाबांच्या सन्निध बसले असतां बाबा त्यांना म्हणाले, “ सगुण, मला सकाळीं न्याहारीला थोडा थोडा मऊ मऊ भात आणीत जा. ” त्याप्रमाणें सगुण भात वगैरे मशिदींत ( द्वारकामाई ) घेऊन गेले व धुनीमाईजवळील भिंतीजवळ उभे राहिले.

बाबांनी त्यांना विचारलें— “ भातावर तूप घातलें आहे काय ? ”

सगुणः—नाहीं.

बाबाः— “ आतां दररोज तूप घालून भात आणीत जा ” असें म्हणून त्या भातांपैकीं पांच घांस धुनीमाईंत टाकले व म्हणाले “ सगुण, दररोज भातावर तूप घाल, नंतर दोन घांस धुनीमाईंत टाक आणि नंतर मला देत जा. ”

ह्यावरून अन्न शिजलें म्हणजे प्रथम त्यावर तूप घालून अग्नीला देणें ह्यालाच “ वैश्वदेव ” म्हणतात, म्हणजे अन्न शुद्ध होतें व नंतर ताट भरून तो साईबाबाला अगर इष्ट देवतेला नैवद्य दाखवून मग तो प्रसाद म्हणून आपण ग्रहण करावा. ह्यावरून सगुण मेरू नाईक यांना बाबांनीं तीन तत्त्वांचा उपदेश केला.

( १ ) सकाळीं न्याहारी व दुपारीं नैवेद असें दोन वेळां जेवण.

( २ ) भातावर अगर भाकरीवर तूप घालणें=अन्नशुद्धी.

( ३ ) भाताचे पांच घांस आग्नींत टाकणें=वैश्वदेव.

इतकें केल्यावांचून बाबांना ( परमात्म्याला ) न्याहारी किंवा नैवेद्य देऊं नये.

संपादक

# श्री. साईबाबा शिरडी संस्थानांत
## विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | किंमत रु. आ. पै |
|---|---|---|
| १ | श्री साई सच्चरित्र [ मराठी ] ... ... | ७–०–० |
| २ | सच्चरित [ इंग्रजी ] ... ... | ४–०–० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी ... | ०–२–० |
| ४ | ,, [ अध्याय ४ था ] ... | ०–८–० |
| ५ | सगुणोपासना .... .... ... | ०–३–० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक [ इंग्रजी ] .... ... | १–४–० |

वरील पुस्तकांकरितां व बाबांचे विश्वसनीय निरनिराळ्या साईजच्या फोटो वगैरेकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

मॅनेजर, **शिरडी संस्थान,** मु. शिरडी, पो. रहातें, जि. **अहमदनगर**
श्री. वि. आ. वैद्य, चाचडची चाळ, वरसावा रोड, अंधेरी, **मुंबई.**

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी तर्फे
संपादक :– **डॉ. के. भ. गव्हाणकर** यांनीं, काळाचौकी रोड, मुंबई १२ येथें प्रसिद्ध केलें.

मुद्रक :– **के. एन. सापळे,** रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, ज्यूडेक्स बिल्डिंग, त्रिभुवन रोड, **मुंबई ४.**